Website : www.dainikmahasagar.in
Epaper : www.epaper.dainikmahasagar.in

मराठी महाराष्ट्राचा बुलंद आवाज

# महासागर

e-mail : nagpurpost@gmail.com ● mahasagarngp@gmail.com

संपर्क
संपादकीय : 9922970023; वितरण : 8888647753
जाहिरात : 7447735851 / 9326906062
नागपूर कार्यालय संपर्क : 7447735851
नागपूर मुख्य कार्यालय : कॉटन मार्केट, नागपूर – 440018

महासागर | NAGPUR POST
महासागर व NAGPUR POST ची जोडी, वाचतांना येईल वाचनाची गोडी
महासागर (मराठी) आणि NAGPUR POST (English)
घरपोच पाठविण्याची सुविधा.

महासागर किंमत Rs. 3
Nagpur Post Rs. 3 = 6
जाडी पेपरसह फक्त 4 रुपयात

* वर्ष ५४ * अंक २८६ * * नागपूर * सोमवार, दिनांक १३ जानेवारी २०२५ ८ पाने ● किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.)

## अमरावती एमआयडीसीत 100 महिलांना विषबाधा

अमरावती, दि.१२ प्रतिनिधी

अमरावतीत 100 पेक्षा जास्त महिलांना विषबाधा झाली आहे. अमरावतीच्या नांदगाव पेठ एमआयडीसीमधील गोल्डन फायबर कंपनीत ही घटना घडली आहे. सर्व महिलांवर अमरावतीच्या जिल्हा रुग्णालयात उपचारसुरू आहेत. विशेष म्हणजे अमरावतीत काही दिवसांपूर्वी एका शाळेत विद्यार्थ्यांना विषबाधा झाल्याची माहिती समोर आली होती. त्यानंतर आता नांदगाव पेठ एमआयडीसीतील गोल्डन फायबर कंपनीत महिलांना विषबाधा झाल्याची माहिती समोर आली आहे. संबंधित घटना अतिशय चिंताजनक आणि धक्कादायक आहे. कारण 100 पेक्षा जास्त महिलांना ही विषबाधा झाली आहे. त्यांच्यावर सध्या जिल्हा रुग्णालयात उपचार सुरू आहेत. काही महिलांनी सांगितलेल्या माहितीनुसार, कंपनीतील पाणीतून किंवा नाश्तामधून ही विषबाधा झाल्याचा संशय आहे.

## संपादकीय खरीखरी

## पतंग पुराण

पतंगबाजी आपल्या भारतात प्राचीन काळापासून लोकप्रिय आहे. विशेषता मकर संक्रांतीच्या प्रसंगी पतंग उडवण्याची परंपरा बरीच जुनी आहे. आता तर जगभरातील अनेक भागात पतंग सप्ताहही साजरा होतो. दुनियेत कागदाचा अविष्कार झाल्यापासून पतंग उडवणे सुरूच आहे. आम्ही वर म्हटल्याप्रमाणे केवळ भाराताच्याच नाही तर जपान आणि थायलंड सारख्या इतरही अनेक देशात पतंगबाजी जोरदारपणे केली जाते. काही ठिकाणी या पतंगबाजीची प्रतियोगिता म्हणजेच स्पर्धाही असते. आकाशात पतंग उडवताना एक दुसऱ्याच्या पतंगाचा दोरा कापणे, हा मोठा मजेदार खेळ आहे. आपल्या भारतातील अहमदाबाद शहर तर पतंगोत्सवासाठी जगप्रसिद्ध आहे. उद्या म्हणजेच मकर संक्रांतीच्या दिवशी अहमदाबादचे आकाश पतंगाबाद होत असते. जगातील अनेक हौशी पतंगबाज खेळाडू या आंतरराष्ट्रीय पतंगोत्सवात भाग घेतात. या शहरात एक पतंगांचे संग्रहालय सुद्धा आहे. एका पतंग वेड्या भानु शहा नामक पतंग प्रेमीने आपल्याकडील अत्यंत आगळ्यावेगळ्या जुन्या (अँटिक) आणि दुर्मिळ पतंगांचा संग्रह दिल्यामुळे या संग्रहालयात जगातील अनेक भागातील पतंग दिसतात. म्हणजे ही पतंगबाजी केवळ मनोरंजनाचा विषय नसून सध्या स्पर्धेचा आणि मोठ्या सामाजिक महोत्सवाचा विषय झालेला आहे. मकर संक्रातीला आपण आपल्याला प्रकाश देणाऱ्या सूर्याची पूजा करतो. तीळगुळ देतो आणि गोड गोड बोलण्याचे गीत गातो. पण गेल्या काही वर्षात आपल्या देशातील पतंग महोत्सवात खऱ्याखुऱ्या महोत्सवाऐवजी भलतेच आरिष्ट ओढवले गेलेले आहे. पतंगासाठी मांजा म्हणून जो दोरा वापरला जातो. त्यामध्ये नायलॉन दोऱ्यासारखा दोरा अनेकांना जखमी करण्यासाठी किंवा चालत्या फिरत्या माणसांचे गळे कापण्यासाठी अत्यंत कुप्रसिद्धी पावलेला आहे. या नायलॉन मांजाप्रमाणे चीनमधून येणारा मांजा अत्यंत घातक आहे. काचेचा चुरा करून त्याच दोऱ्यावर त्याचे आवरण घातलेला हा मांजा आहे. याचा वापर बंदी असूनही करण्यात येतो. पोलिसांकडून कठोर कारवाई होत असते. तरीही अनेक शहरात अशा मांजाची विक्री करणाऱ्या विरुद्ध जबरदस्त कारवाई करूनही त्यावर चाप लावला जात नाही. चांगला पैसा मिळत असल्याने अनेक मांजा विक्रेते सरकारी आदेश धाब्यावर बसून हा मांजा विकत आहेत. परवा संक्रांत आहे. पण त्यापूर्वीच दुचाकीस्वारांचे गळे चिरण्याच्या घटना रोज कानावर येत आहेत. संक्रांतीपूर्वीच अनेक निष्पाप जीवांवर घातक मांजाची संक्रांत येत आहे. हा मांजा केवळ माणसांसाठीच घातक आहे असे नाही. तर कित्येक पक्षी सुद्धा या मांजाच्या विळख्यामुळे जखमी झालेले आहेत. हा नायलॉन मांजा प्लास्टिकसारखा असतो अनेक मोठमोठ्या वृक्षांवर तो दिसून येतो. अशा परिस्थितीत पतंग महोत्सवावर आपदा येणे स्वाभाविक आहे. ज्याप्रमाणे सिगारेट ओढणे आरोग्यासाठी हानिकारक आहे. दारू पिणे सुद्धा हानिकारक आहे. पण तरीही सरकारमान्य दारू दुकानातून दारू घेऊन झिंगणाऱ्यांची कमी नाही. प्रत्येक पानपट्टीवर मस्तपैकी सिगारेटची विक्री होत असते. याच सिगरेटचे मोठ्या आनंदात केवळ सी- ग्रेडचेच नाही. तर तथाकथित ए- ग्रेडचे लोकही सिगारेटचा धूर मोठ्या रुबाबाने सोडतात. म्हणजेच थोडक्यात स्वतःला धोका असून आपले लोकही व्यसने करतात. पतंगाचे मात्र एक आहे. पतंगाच्या मांज्यामुळे जो पतंग उडवत असतो. त्याला कधीच त्रास होत नाही. त्याचा त्रास इतरांना होतो. पण हल्ली इतरांचा विचार करणे. म्हणजे आपला वेळ वाया दवडणे असा ज्यांचा समज आहे. असे अनेक पतंगवीर मैदाने सोडून तंग गल्लीतही आपला पतंगोड्डाणाचा कार्यक्रम बेधडकपणे पार पाडतात. छोटी-मोठी मुले पतंगाच्या मागे धावतात. पन्नाशीच्या आसपासची 'मुले' सुद्धा कटलेल्या पतंगाला धरण्यासाठी धावाधाव करतात. म्हणजे 'मनी आहे पतंगाचा भाव, पतंगा पतंगा मला पाव' असा मनातल्या मनात पतंगाचा जप करून आपली हौस भागवणारे महाभाग काही कमी नाहीत. या सर्व पतंग वीरांना आमची विनम्र विनंती आहे की, बाबांनो पतंगाचा खेळ खेळा. जिवाचा खेळ खेळू नका. सरकारने केलेले नियम मोडू नका आणि कोणाच्याही आयुष्याची दोरी तोडू नका. ईति पतंग पुराणम् संपूर्णम !

nagpurpost@gmail.com
Mob.No.9922970023

# आजपासून प्रयागराज महाकुंभ 2025



## भारतीय संस्कृती आणि अध्यात्माचा एक उत्साही संगम!



| शाही स्नान |
| --- |
| १३ जानेवारी २०२५ – पौष पौर्णिमा |
| १४ जानेवारी २०२५ – मकर संक्रांत |
| २९ जानेवारी २०२५- मौनी अमावस्या (सोमवती) |
| ३ फेब्रुवारी २०२५ – वसंत पंचमी |
| १२ फेब्रुवारी २०२५ – माघी पौर्णिमा |
| २६ फेब्रुवारी २०२५ – महाशिवरात्री |

प्रयागराज, दि. १२ वृत्तसंस्था

महाकुंभ हा केवळ एक धार्मिक कार्यक्रम नाही तर तो भारतीय संस्कृती आणि अध्यात्माचा एक जिवंत संगम आहे, जो लोकांना त्यांची श्रद्धा पुन्हा जागृत करण्याची आणि देवाशी जवळीक साधण्याची संधी प्रदान करतो. प्रयागराजमधील महाकुंभ २०२५ चा हा कार्यक्रम सर्व भाविकांसाठी एक अविस्मरणीय अनुभव असणार आहे, जे श्रद्धा, एकता आणि भक्तीच्या या अनोख्या उत्सवात सहभागी होऊन आध्यात्मिक शांतीचा अनुभव घेतील.

१३ जानेवारी २०२५ रोजी पौष पौर्णिमेच्या स्नानाने महाकुंभाचीसुरूवात होईल आणि २६ फेब्रुवारी २०२५ रोजी महाशिवरात्रीच्या शेवटच्या स्नानाने त्याची सांगता होईल. कुंभमेळ्यात पहिले स्नान संतांच्या नेतृत्वाखाली केले जाते, ज्याला कुंभाचे 'शाही स्नान' म्हणून ओळखले जाते आणि ते पहाटे ३ वाजता सुरू होते. संतांच्या शाही स्नानानंतर सामान्य लोकांना पवित्र नदीत स्नान करण्याची परवानगी मिळते.

महाकुंभमेळा १३ जानेवारी ते २६ फेब्रुवारी असा ४४ दिवस चालणार आहे. या दिवसात अनेक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी सरकार आणि प्रशासनाला महाकुंभमेळ्याच्या आयोजनासाठी तत्परतेने पूर्ण तयारी करण्याचे आदेश दिले आहेत. सुरक्षा व्यवस्था कडक करण्यात आली आहे. देशातील लाखो भक्त प्रयागराजमध्ये दाखल झाले आहेत, होत आहेत. यावेळी, संगम किनाऱ्यावर ४० कोटींहून अधिक लोक धार्मिक स्नान करण्यासाठी जमतील अशी माहिती आहे.

महाकुंभमेळा म्हणजे भाविकांसाठी शाही स्नान खूप महत्वाचे मानले जाते. म्हणून या काळात लाखो भाविक गंगा नदीत शाही स्नान करतात. अशा परिस्थितीत, कोणताही अपघात टाळण्यासाठी, पोलिसांसोबत पाण्याखालील ड्रोनचीही व्यवस्था करण्यात आली आहे. हे ड्रोन ३०० मीटर खोलीपर्यंत निरीक्षण करू शकतात.

प्रयागराज जिल्हा प्रशासनाने महाकुंभमेळ्यातील शाही स्नानाच्या महत्त्वाच्या तारखा जाहीर केल्या आहेत. या तारखांना जास्त गर्दी असेल असे गृहीत धरून व्यवस्थापन आणि सुरक्षा व्यवस्था करण्यात आली आहे.

महाकुंभ २०२५ हा उत्तर प्रदेशमधील प्रयागराजमध्ये मकर संक्रांतीच्या दिवसापासून म्हणजेच १३ जानेवारीपासून सुरू होत आहे. जगातील सर्वात मोठा धार्मिक मेळावा असलेला कुंभमेळा हा १५ किलोमीटरच्या परिघात सुमारे ४५ दिवस चालणार आहे. या महाकुंभ मेळाव्यात येणारे नागा साधू कोण असतात? त्यांना धर्मरक्षक का म्हटले जाते? याबाबत शंकराचार्य स्वामी अविमुक्तेश्वरानंद म्हणाले, "नागा हा शब्द नागपासून आला आहे. नाग म्हणजे पर्वत. जे हलत नाहीत, ते एकाच ठिकाणी राहता त्याला नाग म्हणतात. हे नागा साधू बलवान आणि शक्तीचे प्रतीक आहेत. जो कधीही हालचाल करत नाही. नागा म्हणजे कधीही डगमगत नाही. अशा विचारसणीच्या साधुंना नागा साधू म्हटले जाते".

जेव्हा माणूस संन्यास घेतो तेव्हा तो सर्वकाही गोष्टींचा त्याग करतो. त्यामुळे तो पूर्णपणे नग्न होऊन उत्तरेकडे हिमालयाकडे निघतो. यावेळी गुरू त्याला थांबवून कमरेला वस्त्र देतात. ज्ञानप्राप्ती ध्यान करण्यासाठी आज्ञा देतात. गुरु थांबवित असल्यानं संन्यासी थांबतात. अन्यथा, त्यांना संन्यास घेण्यासाठी पूर्णपणे नग्न होऊन हिमालयात जायचे असते. जे भिक्षू कपड्यांशिवाय राहतात त्यांना नाग म्हणतात. त्यांना दिगंबर असेही म्हणतात. सनातन धर्मात नागा साधू हे संपूर्ण जीवनात देवाच्या भक्तीत मग्न राहतात. ते कधीही कपडे घालत नाहीत.

### नागांचा काय इतिहास आहे?

प्राचीन काळात अनेक आक्रमणकर्त्यांना भारतावर हल्ले. त्यांचा पसरवण्यासाठी जनतेवर अत्याचार केले. त्या आक्रमकांना रोखण्यासाठी नागा साधू पुढे आले. त्यांनी परकीयांविरोधात अनेक लढाया लढल्या आहेत. नागांनी त्यांच्या धर्माचे रक्षण करण्यासाठी आपले प्राणही अर्पण केले. यामुळे सामान्य लोकांमध्ये त्यांचे महत्त्व आणि आदर आणखी वाढला. त्यांना शूर पुरुष, धर्मरक्षक आणि धर्मवीर म्हणून ओळखले जाते.

# अमित शहांचा ठाकरे-पवारांवर हल्लाबोल



शिर्डी, दि. १२ प्रतिनिधी

भारतीय जनता पक्षाचे राज्यस्तरीय अधिवेशनाचा समारोप रविवारी शिर्डीत झाला. या समारोप समारंभास भाजप नेते आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शाह आले होते. सध्या शिवसेना उबाठा आणि शरद पवार यांच्या राष्ट्रवादीकडून भाजपसंदर्भात चांगली वक्तव्य केली जात आहे. त्यामुळे अनेक राजकीय पंडितांना आश्चर्य वाटत आहे. परंतु रविवारी अमित शाह यांनी शरद पवार आणि उद्धव ठाकरे यांना घेरले. त्यांच्यावर घणाघाती टीका केली. महाराष्ट्रातील जनतेच्या विश्वासघात केल्याची टीका अमित शाह यांनी केली.

अमित शाह यांनी सांगितले की, १९७८ मध्ये शरद पवार यांनी बंडखोरी केली होती. त्यांनी त्यावेळी विश्वासघात करण्याचे जे राजकारण केले होते, त्यावेळी त्यांना धडा शिकवण्याचा काम महाराष्ट्रातील जनतेने केले होते. त्यानंतर उद्धव ठाकरे यांनाही २०१९ मध्ये आमच्यासोबत द्रोह केला. त्यांनी विचारधारा सोडली. बाळासाहेब ठाकरे यांचे विचार सोडले. त्या उद्धव ठाकरे यांना धडा शिकवण्याचे काम तुम्ही केले. विधानसभा निवडणुकीत त्यांना त्यांची जागा दाखवली. १९७८ ते २०२४ पर्यंत महाराष्ट्र जेव्हा जेव्हा अस्थिर करण्याचा प्रयत्न केला. त्या, त्या वेळी स्थिर सरकार देण्याचे काम तुम्ही केले. हिंदुत्व आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या विकासाच्या राजकारणास विरोध करणाऱ्यांना तुम्ही धडा शिकवला. विधानसभा निवडणुकी खरी शिवसेना खऱ्या राष्ट्रवादीला तुम्ही विजय केले. घराणेशाही राजकारण करणाऱ्यांना नाकारले.

शरद पवार यांच्यावर टीका करताना अमित शाह म्हणाले, काही दिवसांपूर्वी मी एक चित्र पाहत होते. त्या चित्रात शरद पवार महाराष्ट्रातील विविध विभागाकडे पाहत होते. त्या चित्राचा अर्थ मी शरद पवार यांना समजवतो. महायुतीला उत्तर महाराष्ट्रात २२ पैकी २१ जागा विधानसभेत मिळाल्या. कोकणात १७ मधून १६ जागा मिळाल्या. पश्चिम महाराष्ट्रात २६ मधून २४ जागा मिळाल्या. पश्चिम विदर्भात १७ पैकी १६ जागा मिळाल्या. पूर्व विदर्भात २९ पैकी २२ तर मरावाड्यात २० पैकी १९ जागा मिळाल्या. मुंबईत १७ पैकी १५ जागांवर विजय मिळला.

शरद पवार मुख्यमंत्री राहिले, देशाचे कृषीमंत्री राहिले. परंतु राज्यातील शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबवू शकले नाही. आता भाजप सरकार प्रत्येक शेतकऱ्यांच्या शेतापर्यंत पाणी पोहचवल्याशिवाय थांबणार नाही, असे अमित शाह यांनी म्हटले. ते पुढे म्हणाले, लोकसभेनंतर महाराष्ट्रात महायुतीचा पराभव होणार? अशी स्वप्न पाहिली जात होती. त्यांचे स्वप्न तुम्ही धुळीस मिळवली. महाराष्ट्राचा महाविजयाने देशातील राजकारणावर पटरीवर आणले गेले. या महाविजयाचे श्रेय भाजप कार्यकर्ते आणि महाराष्ट्रातील जनतेला आहे, असे अमित शाह यांनी म्हटले

## श्रद्धा आणि सबुरीचा मंत्र त्यांना समजला नाही - फडणवीस



विधानसभेच्या निवडणुकीत भारतीय जनता पक्षाला मिळालेल्या घवघवीत यशानंतर आता भाजपाचं शिर्डीत महाविजय अधिवेशन पार पडत आहेत. या अधिवेशनासाठी राज्यातील भाजपाचे सर्व नेते आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शाह हे देखील उपस्थित आहेत. आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या अनुषंगाने भाजपाचं हे अधिवेशन महत्वाचं मानले जात आहे. या अधिवेशनात बोलताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेच्या निवडणुकीत भाजपाला मिळालेल्या यशाबद्दल सर्वांचे आभार मानले. तसेच महाविकास आघाडीवर जोरदार हल्लाबोल केला. 'ज्यांना श्रद्धा आणि सबुरीचा अर्थ समजला नाही, त्यांची हालत काय झाली? हे विधानसभेला आपण पाहिले', असे म्हणत देवेंद्र फडणवीस यांनी विरोधकांवर जोरदार हल्लाबोल केला.

"महाराष्ट्रामध्ये आपल्याला जो महाविजय प्राप्त झाला, त्याबद्दल आपल्या सर्वांना माझा साष्टांग दंडवत. कारण जनतेमुळे हा महाविजय मिळाला. आपल्या या लढाईमध्ये २४ तास आपल्याबरोबर अमित शाह होते. लोकसभेच्या निवडणुकीत मिळालेल्या अपयशानंतर कार्यकर्त्यांना लक्षात येत नव्हतं की आपले काय चुकले? मात्र, अशा परिस्थितीत अमित शाह यांनी विविध ठिकाणी मेळावे घेत आपल्याला मार्गदर्शन केले, कार्यकर्त्यांच्या मनात ऊर्जा निर्माण केली. त्यानंतर भाजपाने महाविजय मिळवला.

"साईबाबांनी आपल्याला श्रद्धा आणि सबुरीचा मंत्र दिला. श्रद्धा आणि सबुरीचा मंत्र आपल्या भाजपात महत्वाचा आहे. राष्ट्र प्रथम म्हणजे श्रद्धा आणि नंतर सबुरी म्हणजे आपण. हा मंत्र आपण सर्वजण पाळत असतो. आपल्याला माहिती आहे की ज्यांना हा मंत्र समजला ते सर्व यशस्वी झाले. पण श्रद्धा आणि सबुरीचा मंत्र ज्यांना समजला नाही, त्यांची हालत काय झाली? हे आपण विधानसभेच्या निवडणुकीत पाहिले", असे म्हणत देवेंद्र फडणवीसांनी विरोधकांवर टीका केली.

## तुम्हारे पांव के नीचे कोई ज़मीन नहीं...

### आशिष शेलार यांचा शेरो शायरीतून निशाणा

आशिष शेलार यांनी म्हटले की, "उद्धव ठाकरेंनी बल्गना केली होती की देवेंद्र फडणवीस राहतील किंवा मी राहील. तसेच लोकसभेच्या निवडणुकीत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना मी असा नडलो की त्यांना घाम फुटला. त्यांचे भाषण पाहताना कीव येते, असे उद्धव ठाकरे म्हणाले होते. आम्ही असेच आहोत वाकड्यात गेलो की तोडून टाकतो, असेही त्यांनी म्हटले होते. एवढेच नाही तर उद्धव ठाकरे हे देवेंद्र फडणवीसांना म्हणाले होते की, एक तर तुम्ही राहताल किंवा मी राहील. मात्र, तरीही देवेंद्र फडणवीस यांनी स्वभावानुसार काहीही उत्तर दिले नाही", असे म्हणत आशिष शेलारांनी ठाकरेंवर टीका केली. आशिष शेलार यांनी असेही म्हटले की, "उद्धव ठाकरेची मी तुम्हाला आणि तुमच्या पक्षाला सांगतोय. तुम्हारे पांव के नीचे कोई ज़मीन नहीं कमाल ये है की फिर भी तुम्हें यक़ीन नहीं", अशा शेरोशायरीतून आशिष शेलार यांनी उद्धव ठाकरेंवर हल्लाबोल केला.

## कुणाला मिरच्या लागण्याचे कारण नाही; काँग्रेस नेत्यांनी ऐकून घेण्याची सवय ठेवावी- संजय राऊत

मुंबई, दि. १२ प्रतिनिधी

काँग्रेसच्या नेत्यांनी माझं म्हणणं परत एकदा ऐकले पाहिजे. किंबहुना काँग्रेस नेत्यांनी ऐकून घेण्याची सवय केली पाहिजे. लोकसभेसाठी आपण इंडिया आघाडी तयार केली होती. राज्यात विधानसभेसाठी महाविकास आघाडी तयार केली होती. अशातच स्थानिक स्वराज्य संस्था या कार्यकर्त्यांच्या निवडणुका असतात. त्यामुळे मी कार्यकर्त्यांच्या भावना मांडल्या. लोकसभा, विधानसभा या वेगळ्या निवडणुका आहेत. तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका जर का स्वबळावर लढल्या तर पक्ष वाढीसाठी ते फायद्याचे ठरेल.



शिवसेनेचे मशाल चिन्ह हे जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोहोचवण्याचे आमचे प्रयत्न सुरू आहे. अद्यापही लोकांमध्ये संभ्रम आहे. त्यामुळे ग्रामपंचायत, जिल्हा परिषद, नगरपालिका या निवडणुकांमध्ये जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोहोचवण्याची संधी उपलब्ध होत असते. अशीच सर्व राजकीय पक्षांची धारणा आहे. इंडिया आघाडी किंवा महाविकास आघाडी तुटली असे मी कधीही म्हणालो नाही. केवळ आमच्या पक्षाच्या कार्यकर्त्यांच्या भावना मांडल्या. त्यामुळे कुणालाही मिरच्या लागण्याचे कारण नाही. आपल्या पक्षाचा विस्तार करण्याचा अधिकार सर्वांना असल्याचे स्पष्टीकरण देत ठाकरे गटाचे खासदार संजय राऊतांनी काँग्रेस नेत्यांचे कान टोचले आहेत.

## राखेची वाहतूक करणाऱ्या टिप्परने सरपंचाचा घेतला जीव

बीड, दि. १२ प्रतिनिधी

सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणावरून वातावरण तापलेलं असताना जिल्ह्यात एका सरपंचाचा अपघातात मृत्यू झाला. परळी धर्मापुरी मार्गावरील मिरवट फाट्यावर राखीची वाहतूक करणाऱ्या टिप्परनं दुचाकीला धडक दिल्यानं सरपंच अभिमन्यू क्षीरसागर यांचा मृत्यू झाला. ते सौंदाना गावचे सरपंच होते.

मिळालेल्या माहितीनुसार सरपंच अभिमन्यू क्षीरसागर हे परळीवरून शनिवारी रात्री साडेआठ वाजता काम आटपून दुचाकीनं गावाकडे निघाले होते. मिरवट येथे त्यांच्या दुचाकीला टिप्परनं धडक दिली. यावेळी अभिमन्यू क्षीरसागर हे जोराच्या धडकेनं रस्त्याच्या कडेला जाऊन पडले. या भीषण अपघातात त्यांचा जागीच मृत्यू झाला. सरपंच क्षीरसागर यांच्या मृत्यूची माहिती कळताच परिसरातील नागरिकांनी एकच गर्दी केली होती. सरंपच क्षीरसागर यांचा





मृतदेह परळी येथील जिल्हा रुग्णालयात शवविछेदन करण्यासाठी पाठवण्यात आला आहे. बीडमधील राखेचे अवैध व्यवसाय होत असल्याचे आरोप होत असताना सरपंचाचा अपघाती मृत्यू झाला आहे. अभिमन्यू क्षीरसागर यांच्या अपघाती मृत्यूबाबत पोलीस अधिक तपास करत आहेत. हा टिप्पर कोणाच्या मालकीचा आहे, याचादेखील पोलीस तपास करत आहेत.

यापूर्वी आमदार सुरेश धस यांनी बीडमधील दहशतीचा मुद्दा मांडताना पर्यावरणाची समस्या भीषण असल्याचा उल्लेख केला होता. ते म्हणाले होते, " परळीमधील राखेसंदर्भात पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे यांना पत्र देणार आहे. कारण, पर्यावरण खातं सुद्धा आमच्या जिल्ह्यात आहे. परळी तालुक्यात सर्वाधिक प्रदूषण होते. सिरसाळाजवळ गायरान 300 वीट भट्टी आहेत. यामधील दीडशे लोक हे माजी पालकमंत्री यांच्या घरातील लोक आहेत. ते राखेची वाहतूक करत असतात," असा खळबळजनक दावाही धस यांनी केला होता.

सरपंचाच्या अपघाती मृत्यूनंतर परळीमधील राख वाहतुकीचा मुद्दा पुन्हा चर्चेत आला आहे. परळीच्या औष्णिक विद्युत केंद्रापासून काही अंतरावर असलेल्या सौंदाना गावाच्या परिसरात मोठ्या प्रमाणात वीट उत्पादन करण्याचे कारखाने मोठ्या प्रमाणात आहेत. या परिसरात मोठ्या प्रमाणात प्रदूषणदेखील होत आहे. गेली अनेक वर्ष या भागात वीटभट्ट्यांमधून होणारे प्रदूषण आणि औष्णिक विद्युत केंद्रातून बाहेर पडणारी राख, त्याची वाहतूक करणारे टिप्पर यामुळे या भागातील नागरिकांना आणि शेतकऱ्यांना त्रास सहन करावा लागत आहे. या भागातील नागरिकांचे आरोग्य अनेक वेळा बिघडत असल्याचीदेखील प्राथमिक माहिती मिळत आहे.

## मुंडे यांच्या राजीनाम्याबाबतच्या प्रश्नावर अजितदादा भडकले

पुणे, दि. १२ प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील सरपंच हत्याप्रकरणावरुन राज्यातील वातावरण तापलं असून विरोधक व बीडमधील लोक प्रतिनिधींकडून सातत्याने मंत्री धनंजय मुंडेंचा राजीनामा मागितला जात आहे. मात्र, धनजंय मुंडेंच्या राजीनाम्याबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी भूमिका स्पष्ट केली आहे. विरोधकांना त्यांचं राजकारण लखलाभ असे म्हणत मुंडेंचा राजीनामा हे राजकारण असल्याचंच त्यांनी सूचवलं आहे. तर जोपर्यंत पुरावा सापडत नाही, तोपर्यंत मंत्री धनंजय मुंडे यांच्यावर कोणत्याही प्रकारची कारवाई होणार नाही, अशी भूमिका उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी या पूर्वीच घेतल्याची माहिती पुढे आली होती. अशातच आज पुण्यात पुन्हा पत्रकारांनी धनंजय मुंडे यांच्या राजनाम्याबाबत प्रश्न विचारला असता अजित दादा काहीसे भडकले असल्याचे बघायला मिळाले आहे.



राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी कराड प्रकणात चौकशी सुरू केली असून एसआयटी, सीआयडी चौकशी करत आहे. यात जे कोणी दोषी असतील त्यावर कारवाई करण्यात येईल, असे ही सीएम म्हणतात यात सगळ्या चौकश्या सुरू आहेत. किंबहुना बीड प्रकरणाचे कोणीही दोष असतील त्यांच्यावर कारवाई झाली आणि पुढेही होईल अशी प्रतिक्रिया देत सरपंच संतोष देशमुख हत्याप्रकरणावर प्रतिक्रिया दिली आहे.

## जातीनिहाय जनगणना करा नाहीतर आम्हाला 51% घोषित करा -भुजबळ

धारशिव, १२ प्रतिनिधी

राज्यात महायुतीची सत्ता आली. मात्र राष्ट्रवादीचे ज्येष्ठ नेते छगन भुजबळ यांचा मंत्रिमंडळात समावेश झाला नाही. मंत्रिमंडळातून डावलल्यानंतर छगन भुजबळांनी जाहीर नाराजी व्यक्त केलीय. आता छगन भुजबळ यांची अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषद ॲक्टिव्ह झाल्याचं पहायला मिळत आहे. मराठवाड्यात गाव तिथे समता परिषदेची शाखा आणि घर तिथं समता सैनिक ही मोहीम समता परिषदेकडून राबविण्यात येत आहे. धाराशिव येथे समता परिषदेची आढावा बैठक पार पडली. या बैठकीत परिषदेचे राज्य उपाध्यक्ष सुभाष राऊत यांनी पुढील रणनीती पदाधिकाऱ्यांना सांगितली. धाराशिव जिल्ह्यात पहिल्या टप्प्यात 100 शाखांचे उद्घाटन करण्याचं यावेळी ठरवण्यात आले आहे. त्यामुळे स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका पूर्ण ताकदीने लढण्याची तयारी छगन भुजबळांची समता परिषदेकडून सुरू असल्याचे चित्र आहे.

जातीनिहाय जनगणनेची मागणी आम्ही अनेक वर्षांपासून करत आहोत. मात्र आमची वेळोवेळी फसवणूक झालेली आहे. मराठा आरक्षणाला माझा विरोध नाही. मात्र ते आमच्यात आले तर आम्हालाही काही मिळणार नाही आणि त्यांनाही काही नाही. त्यामुळे जातीनिहाय जनगणना करा नाहीतर आम्हाला 51% घोषित करा. अशी मागणी आज शेगाव येथील माळी समाजाच्या मेळाव्यात केली. यावेळी त्यांनी मनोज जरांगे यांच्यावरही टीका केली.




छगन भुजबळ म्हणाले की, "अशा कार्यक्रला जाणे मी टाळतो. कारण समाज एक असला तरी पक्ष वेगळे असतात, विचारसरणी वेगळी असते. मी ओबीसींच्या प्रश्नावर शिबसेना सोडली. मी नरसिंह राव यांच्याकडे गेलो. त्यावेळी नरसिंह राव यांनी ओबीसी समाजाची सेवा करण्याचा सल्ला दिला होता. त्यातूनच समता परिषद स्थापन झाली. आदिवासी, दलित, ओपन आणि ओबीसी या चार वर्गात बाबासाहेबांनी समाजाला बांधलं. व्ही पी सिंहानी नंतर मंडळ आयोगासाठी काम केलं. त्यानंतर आपल्याला 30 टक्के आरक्षण मिळालं."

## पंकजा मुंडेंच्या टीकेवर सुप्रिया सुळेंचा पलटवार

मुंबई, दि. १२ प्रतिनिधी

गुन्हेगारीच्या घटना विविध जिल्ह्यांमध्ये घडत असून अशा घटना थांबवण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत. या घटनांवर राजकारण होता कामा नये. मात्र परळी, बीडलाच बदनाम केले जात आहे, अशी संतप्त प्रतिक्रिया भाजपा आमदार पंकजा मुंडे यांनी काल दिली होती. त्यांच्या या प्रतिक्रियेवर आता राष्ट्रवादीच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी प्रत्युत्तर दिले आहे. त्या बुलढाण्यात पत्रकारांशी बोलत होत्या.

सुप्रिया सुळे म्हणाल्या, "परभणी आणि बीड या दोन्ही घटना माणुसकीला काळिमा फासणाऱ्या आहेत. राष्ट्रवादीचे खासदार बजरंग सोनावणे यांनी संसदेत पहिल्यांदा महाराष्ट्राच्या वतीने परभणी आणि बीडप्रकरणी आवाज उठवला. संदीप क्षीरसागर, सुरेश धस, जितेंद्र आव्हाड, मुंदडा, अजित पवारांचे आमदार सोळंके यांनी विधानभवनात हा मुद्दा



मांडला. ही अत्यंत क्रूर आणि गलिच्छ घटना झाली आहे. यात राजकारण आणू नये. माणुसकीच्या नात्याने परभणीला न्याय देण्याची मागणी करतेय. या संघर्षाच्या आणि अडचणीच्या काळात ३३ दिवसांनंतरही अनेक प्रश्न अनुत्तरीत आहेत. सातत्याने प्रश्न मांडले जात आहेत, त्याचे उत्तर येत नाही. अजूनही एक खुनी फरार आहे. वाल्मिक कराडला ईडीची नोटीस आली तरीही कारवाई झाली नाही. त्याच्यावर मकोकाही लावण्यात आला नाही. तो अटकेत आहे, पण त्याची अटक कशी झाली? तो शरण आला. ही चेष्टा लावली आहे का?"

## हात जोडून विनंती करतो, उद्धव ठाकरेंची साथ सोडू नका- चंद्रकांत खैरे

छत्रपती संभाजीनगर, दि. १२ प्रतिनिधी

विधानसभेच्या निवडणुकीत महाविकास आघाडीला पराभवाचा धक्का बसल्यानंतर आता महाविकास आघाडीत बिघाडीची शक्यता निर्माण झाल्याचे बोलले जात आहे. याचे कारण म्हणजे गेल्या काही दिवसांत महाविकास आघाडीतील नेते एकमेकांच्या विरोधात टीका-टिप्पणी करत असल्याचे पाहायला मिळत आहे. यातच खासदार संजय राऊत यांनी शनिवारी मोठी घोषणा केली. शिवसेना ठाकरे गट आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका स्वबळावर लढवणार असल्याचे त्यांनी जाहीर केले. त्यामुळे महाविकास आघाडीत फूट पडल्याची चर्चा रंगली आहे.



दरम्यान, आगामी महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर ठाकरे गटाकडून ठिकठिकाणी मेळावे आणि बैठका घेण्यात येत आहे. तसेच कार्यकर्त्यांना निवडणुकीच्या कामाला लागण्याच्या सूचना देण्यात येत आहेत. मात्र, ऐन महापालिका निवडणुकीच्या तोंडावर ठाकरे गटाला मुंबई आणि छत्रपती संभाजीनगर येथे मोठे धक्के बसत आहेत. गेल्या काही दिवसांत अनेक माजी नगरसेवक आणि शेकडो कार्यकर्त्यांनी पक्षाला सोडचिठ्ठी दिली आहे. या सर्व घडामोडींच्या पार्श्वभूमीवर आज छत्रपती संभाजीनगरमध्ये झालेल्या पदाधिकाऱ्यांच्या मेळाव्यात बोलताना माजी खासदार चंद्रकांत खैरे यांनी ठाकरे गटाला सोडून जाणाऱ्या कार्यकर्त्यांना भावनिक साद घालत उद्धव ठाकरेंची साथ सोडू नका, असे म्हणत हात जोडून विनंती करत व्यासपीठावरच कार्यकर्त्यांना दंडवत घातलं.

### कार्यकर्त्यांना घातले दंडवत

"शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे पक्षप्रमुख तथा माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वात आपल्याला आगामी महापालिकेच्या निवडणुका आणि जिल्हा परिषदेच्या निवडणुका लढवणार आहोत. मी तुम्हाला हात जोडून विनंती करतो. तुम्हाला येथे दंडवत घालतो. उद्धव ठाकरे यांच्याकडे आपल्याला पहायचं आहे. आता परवाच्या कार्यक्रमात उद्धव ठाकरे किती कळकळून बोलले. त्यामुळे मी तुम्हाला विनंती करतो की, कुठेही सोडून जाऊ नका. आपण सर्वजण एकत्र मिळून अधिकचांगले काम करू. समजा माझं काही चुकलं तर मला तुम्ही बोलले तरी काही हरकत नाही. पण माझी विनंती आहे की तुम्ही थांबा कुठेही जाऊ नका", असे म्हणत चंद्रकांत खैरे यांनी व्यासपीठावर कार्यकर्त्यांना दंडवत घातले.

# लॅपटॉप चोरीप्रकरणी एकाला मुद्देमालासह अटक

**बदलापूर, दि. ११ : प्रतिनिधी**

बदलापूर शेजारील असलेल्या साईगाव येथील जाधव कुटुंबियांच्या घरातून ३० हजार रुपये किंमतीचा लॅपटॉप चोरून नेणाऱ्या एका चोराला बदलापूर ग्रामीण पोलिसांनी अटक केली आहे. चोराने विकलेला मुद्देमालही जप्त करण्यात पोलिसांना यश आले आहे.ही कारवाई पोलिसांनी दि.०७ जाने. रोजी मंगळवारी केली आहे. ऋषिकेश दुधसागर असे आरोपीचे नाव आहे.




बदलापूर ग्रामीण पोलीस ठाण्याच्या हद्दीत असलेल्या साईगाव येथील जाधव यांच्या घरात चोरीची घटना घडली आहे. आरोपींने रात्री ०८:३० सुमारास घरातून मोक्याचा फायदा घेऊन ASUS कंपनीचा लॅपटॉप घेऊन पळ काढला. कामानिमित्त लॅपटॉपचा शोध घेतला असता मिळाला नाही. त्यामुळे घरी आलेल्या ऋषिकेश दुधसागर यांनीच चोरल्याची तक्रार जाधव यांनी बदलापूर ग्रामीण पोलीस ठाण्यात केली. तेव्हा तपासाद्वारे आणि मुद्देमाल मिळून आल्याने दि.०७ जाने. रोजी ऋषिकेश दुधसागर याला बदलापूर ग्रामीण पोलिसांनी मुद्देमालासह अटक केली आहे. दरम्यान ही कामगिरी बदलापूर ग्रामीण पोलीस ठाण्याचे पो.नाईक राणे, पो.नाईक शिंदे यांनी केली आहे.

# आगामी शंभर दिवसात पावसाळ्यापूर्वी करावयाच्या कामांना प्राधान्य द्यावे - मुख्यमंत्री

**मुंबई, दि. ११ : प्रतिनिधी**

राज्यातील मृद व जलसंधारणांतर्गत माथा ते पायथा तत्त्वावर पाणलोटाचा विकास करावा तसेच जलयुक्त शिवार अभियान ३.०, तलाव दुरुस्ती योजना यासह विभागातंर्गत राबविण्यात येणा-या नाविन्यपूर्ण उपक्रमातंर्गत, आगामी शंभर दिवसात पावसाळ्यापूर्वी करावयाच्या कामांना प्राधान्य देण्याच्या सूचना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केल्या.

मंत्रालयात मृद व जलसंधारण विभागाच्या पुढील १०० दिवस आराखड्याच्या अनुषंगाने आयोजित बैठकीत मुख्यमंत्री श्री. फडणवीस बोलत होते. बैठकीला उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड, राज्यमंत्री इंद्रनील नाईक, मुख्य सचिव सुजाता सौनिक, मुख्य सचिव (वित्त) विभाग ओ.पी.गुप्ता, मुख्यमंत्री कार्यालयाचे अपर मुख्य सचिव विकास खारगे, अपर मुख्य सचिव (नियोजन) राजगोपाल देवरा, प्रधान सचिव अश्विनी भिडे, सचिव डॉ. श्रीकर परदेशी, मृद व जलसंधारण विभागाचे सचिव गणेश पाटील यावेळी उपस्थित होते.

मुख्यमंत्री श्री.फडणवीस म्हणाले की, प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना, जलयुक्त शिवार अभियान, गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार योजना, आदर्शगाव योजना, नवीन जलसंधारण प्रकल्पांची उभारणी व प्रगतीपथावरील प्रकल्प, पूर्ण झालेले प्रकल्पांचे परीक्षण व दुरुस्ती, माजी मालगुजरी तलावांचे पुनरूज्जीवन व दुरुस्ती कार्यक्रम या योजनांमध्ये प्रत्यक्ष सुरू असलेल्या कामांना गती द्यावी. भविष्यकालीन योजनांचे प्रस्ताव तातडीने शासनाकडे सादर करून त्याला मान्यता घ्यावी. राज्यातील सिंचन क्षेत्र वाढविण्यावर भर देवून त्यासाठी योग्य ते नियोजन करा, विभागातील प्रलंबित कामांचा जलद निपटारा करा, पदभरती, विभागातील उपलब्ध



मनुष्यबळाच्या कार्यक्षमतेत वाढ करण्यासाठी प्रशिक्षणांचे आयोजन करावे, असे निर्देश मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी दिले.

उपमुख्यमंत्री श्री. शिंदे म्हणाले की, राज्यातील गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार अंतर्गत धरणातील गाळ काढून तोच गाळ शेतीसाठी वापरण्याच्या कामांना प्राधान्य देवून मार्च पर्यंत ही कामे तातडीने पूर्ण करावी. बऱ्याच ठिकाणी गाळ काढल्यानंतर धरणांची पाणी साठवण्याची क्षमता वाढत आहे तरी आतापासून ही कामे गतीने केल्यास मार्च अखेर मोठ्या प्रमाणात राज्यातील धरणातील गाळ काढण्याची कामे पूर्ण होतील अशा सूचना उपमुख्यमंत्री श्री.शिंदे यांनी केल्या.

**नागरिकांचे जीवनमान उंचावण्यासाठी शहरांच्या विकासाचे उद्दिष्ट ठेवावे**

राज्यातील ४२३ शहरांमधील नागरिकांचे जीवनमान उंचावण्यासाठी या शहरांमध्ये सर्व अत्यावश्यक आणि दर्जेदार सोयी सुविधा उपलब्ध करून त्यांचा सर्वांगीण विकास करण्याचे उद्दिष्ट ठेवावे, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले.

नगरविकास विभागामार्फत येत्या १०० दिवसात करावयाची कामे आणि उपाययोजनांबाबत मुख्यमंत्री श्री.फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत सादरीकरणाद्वारे चर्चा करण्यात आली. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, माहिती तंत्रज्ञान मंत्री आशिष शेलार, मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड, कामगार मंत्री ॲड.आकाश फुंडकर, वित्त व नियोजन राज्यमंत्री आशिष जयस्वाल, मृद व जलसंधारण राज्यमंत्री इंद्रनील नाईक, नगरविकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ, मुख्य सचिव सुजाता सौनिक, मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव विकास खारगे, प्रधान सचिव अश्विनी भिडे, सचिव डॉ.श्रीकर परदेशी, वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव ओ.पी. गुप्ता, नियोजन विभागाचे अपर मुख्य सचिव राजगोपाल देवरा, उपमुख्यमंत्री कार्यालयाचे प्रधान सचिव नवीन सोना, नगरविकास -२ विभागाचे प्रधान सचिव डॉ. के.एच.गोविंदराज आदी उपस्थित होते.

मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले की, राज्यात शहरीकरण झपाट्याने वाढत आहे. तथापि नागरिकांचे जीवनमान उंचावण्यासाठी दर्जेदार सोयी सुविधा उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. या शहरांच्या विकासासाठी निधी उपलब्ध करून देताना घनकचरा आणि सांडपाणी व्यवस्थापन करणे बंधनकारक करावे. सर्व नगरपरिषदांमधील मालमत्तांचे जीआयएस प्रणाली आधारित कर निर्धारणामध्ये सुधारणा करताना नियोजन करून तो दीडपटीपेक्षा अधिक होणार नाही, याची दक्षता घ्यावी, अशा सूचना त्यांनी केल्या. शहरातील सांडपाण्यावर प्रक्रिया करून त्याच्या पुनर्वापराचे पारदर्शी धोरण ठरवा, असेही त्यांनी सांगितले.

उपमुख्यमंत्री श्री.शिंदे म्हणाले, नागरिकांना सोयी सुविधा देताना त्यावर कर आकारला जातो. तथापि, हा कर अनेक वर्षांनंतर सुधारित केला तर नागरिकांवर त्याचा अधिक बोजा पडतो. यासाठी त्यामध्ये नियमित परंतु अल्पवृद्धी करावी, जेणेकरून तो भरणे नागरिकांना शक्य होईल.

# लहान मुलाला मारल्याचा जाब विचारल्याने दोन गटात राडा

**भिवंडी, दि. ११ : प्रतिनिधी**

शहरातील मध्यभागी असलेल्या छत्रपती शिवाजी महाराज चौक परिसरातील आजूबाजूच्या शेजारील पाड्यांमध्ये राहणाऱ्या दोन गटातील कुटुंबियांत लहान मुलाला मारल्याचा जाब विचारल्याच्या वादातून झालेल्या तुफान राड्यात दोन्ही गटातील दोन जण गंभीर जखमी झाल्याची घटना बुधवारी मध्यरात्रीच्या नंतर घडली आहे.याप्रकरणी निजामपूरा पोलिस ठाण्यात परस्पर विरोधी गटातील ६ जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.प्रकाश बबन आहीरे, शोभा प्रकाश आहीरे,गौतम प्रकाश आहीरे,ज्ञानेश्वर प्रभाकर वारूळे,सिमरन पप्प्या पाटील, पल्लवी ज्ञानेश्वर वारूळे अशी गुन्हा दाखल झालेल्या शेजारी पाड्यातील कुटुंबीयांची नावे आहेत.तर या धुमश्चक्रीत ज्ञानेश्वर व शोभा गंभीर जखमी झाले आहेत. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार,८ जानेवारी बुधवारी रोजी मध्यरात्री दीड वाजताच्या सुमारास अजित हॉस्पिटल समोर ज्ञानेश्वर वारळे (रा. कोंबडपाडा,भिवंडी) आणि शोभा अहिरे (रा.संगमपाडा,भिवंडी) या दोन गटात शोभा यांनी त्यांच्या मुलाला का मारले असा जाब ज्ञानेश्वर यांच्या गटाला विचारला असता या गोष्टीवरून शाब्दिक बाचाबाची होऊन दोन गटात शिवीगाळसह कॅमेराचा लोखंडी स्टॅंड,स्टील रॉड,लाकडी स्टॅम्पने हाणामारीचा तुफान राडा झाला. यामध्ये ज्ञानेश्वर आणि शोभा गंभीर जखमी होऊन त्यांच्यावर उपचारा नंतर निजामपूरा पोलिस ठाण्यात परस्पर विरोधी गटातील ६ जणांच्या विरोधात भान्यासं २०२३ च्या कलम ११८(१),३५२,११५(२), ३(५) न्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून सर्वांना भारतीय नागरीक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम ३५(३) प्रमाणे समजपत्र देण्यात आले आहे.पुढील तपास पोउनि भवर करीत आहेत.

# उल्हासनगर महापालिकेने केली नायलॉन मांज्या विक्रीवर बंदी

**उल्हासनगर, दि . ११ : प्रतिनिधी**

१४ जानेवारी २०२५ रोजी मकर संक्रात असल्याने या सणानिमित्त पतंग उत्साह मोठ्या प्रमाणात साजरा होतो. तेव्हा या पतंगासाठी नायलॉन चा मांज्या वापरण्यात येतो. दरम्यान हा मांज्या मानवी जिवीतास आणि पक्षी यांच्या जिवीताला धोका असल्याने हा मांजा वापरु नये असे आवाहन उल्हासनगर महापालिकेच्या वतीने करण्यात आले आहे.



उल्हासनगर शहरातील नागरिकाना महापालिकेने आवाहन केले आहे, की नायलॉन मांज्या हा प्लास्टिक सिंथेटिक पासुन बनवत असुन या मांज्या विरुध्द राष्ट्रिय हरित न्यायाधिकरणा मार्फत आणि मुंबई उच्च न्यायालय औरंगाबाद खंडपीठा मध्ये सुमोटो पी आय एल न . ८/२०२० हे दाखल असुन न्यायालयाच्या निर्देशानुसार नायलॉन मांज्यावर बंदी घातलेली आहे. हा मांज्या मकर संक्रातीच्या दिनी पतंग उडवन्यासाठी वापरत असल्याने या मांज्यामुळे पक्षी व मानवी जिवीतास दुखापत होत असल्यामुळे मांज्याचा वापर करण्यात येवु नये. दरम्यान या नायलॉन मांज्यामुळे विजेच्या तारा तुटून वीज पुरवठा खंडीत होणे , विद्युत उपकरणे खराब होणे , अपघात होणे , पर्यावणाची हानी होणे असे प्रकार घडत असतात. तेव्हा पर्यावरणाची हानी टाळन्यासाठी व पक्षी , मानवी जिवीतास दुखापत होवु नये म्हणुन या नायलॉन मांज्याचा कोणी ही वापर करु नये , जर कोणी वापर करत असल्याचे आढळुन आल्यास त्याला प्रतिबंध करुन वापराच्या दुष्परिणामाबाबत जनजागृती करुन महापालिकेला सहकार्य करावे असे आवाहन जनसंपर्क अधिकारी छाया डांगळे यांनी केले आहे.

# खलाशी कामगारांच्या कल्याणासाठी मुंबईत ऐतिहासिक समझोता करार संपन्न

**मुंबई, दि. ११ : प्रतिनिधी**

भारतातील सागरी कर्मचाऱ्यांच्या कल्याणासाठी एक व्यापक उपक्रम सुरू करण्यासाठी जहाज बांधणी महासंचालनालय (DGS) व आंतरराष्ट्रीय वाहतूक कामगार महासंघ ( ITF) यांच्यामध्ये ७ जानेवारी २०२५ रोजी मुंबईत ऐतिहासिक समझोता करारावर स्वाक्षऱ्या झाल्या. या समझोता करार प्रसंगी मेरीटाईम युनियन ऑफ इंडिया ( MUI ), नॅशनल युनियन ऑफ सिफेरर्स ऑफ इंडिया ( NUSI), फॉरवर्ड सिफेरर्स युनियन ऑफ इंडिया ( FSUI ) या जहाज उद्योगातील युनियनचे प्रतिनिधी उपस्थित होते.

भारतातील सागरी कर्मचाऱ्यांना भेडसावणाऱ्या शारीरिक आणि मानसिक आरोग्यासाठी हे एक महत्त्वपूर्ण पाऊल आहे. डीजी शिपिंगचे महासंचालक श्री. श्याम जगन्नाथन आणि आयटीएफचे ग्लोबल इन्स्पेक्टोरेट समन्वयक श्री. स्टीव्ह ट्रॉसडेल यांच्या भागीदारीतून सागरी प्रशिक्षण संस्थांमध्ये विशेष प्रशिक्षित प्रशिक्षकांचे जाळे स्थापन केले जाईल. त्यामुळे सागरी प्रशिक्षणार्थी आणि सागरी व्यवसायिकांना प्रगत कल्याणासाठी विविध कार्यक्रम दिले जातील.

जागतिक सर्वोत्तम पद्धतीचा अवलंब करून आणि नाविन्य पूर्ण तेला चालना देऊन खलाशांचे मानसिक आरोग्य आणि कल्याण यास प्राधान्य दिले जाईल. हा उपक्रम सागरी उद्योगाच्या भविष्यासाठी आवश्यक आहे, असे श्री जगन्नाथन यांनी स्वाक्षरी करताना सांगितले. नूसीचे सरचिटणीस व खजिनदार श्री. मिलिंद कांदळगावकर यांनी सांगितले की खलाशी कामगारांच्या प्रश्नांची ITF चे श्री. स्टीव्ह ट्रॉसडेल

यांनी दखल घेऊन आपले वचन पूर्ण केले. आय.टी. एफ. चे ग्लोबल वॉर्मिंगचे कोऑर्डीनेटर डॉ. सय्यद असीफ अल्लाफ यांनी सांगितले की अनेक वर्ष नियोजन करून आपण प्रशिक्षणाचे काम करीत होतो परंतु आता या करारामुळे खलाशी कामगारांना अनेक महत्त्वपूर्ण फायदे मिळणार आहेत. नाविक कामगारांच्या कल्याण उपक्रमासाठी MUI, NUSI, FSUI यांच्या पुढाकाराने आणि DGS व ITF भागीदारीमुळे एक नवीन चांगला पायंडा पडला आहे. हा उपक्रम सर्व सागरी संस्थांमध्ये राबविला जात असल्याने समुद्र मार्गाच्या गरजा पूर्ण होऊन चांगला आरोग्यदायी कर्मचारी वर्ग तयार होईल. या उपक्रमा मुळे सागरी मार्गातील भारताचे नेतृत्व केवळ देशाच्या सागरी क्षेत्राला बळकट करत नाही तर जागतिक स्तरावर अशा प्रकारचे प्रयत्न करण्यासाठी एक मॉडेल म्हणून काम करेल. या सहयोगी प्रयत्नातून जागतिक सागरी व्यापार चालू ठेवणाऱ्यांच्या हिताचे रक्षण करण्यासाठी भारतातील नाविक वचनबद्ध आहेत. असे नुसीचे जनरल सेक्रेटरी श्री. मिलिंद कांदळगावकर यांनी सांगितले.

# उल्हासनगर महापालिका आयुक्त विकास ढाकणे यांची उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या उपसचिव पदी बदली

**उल्हासनगर, दि . ११ : प्रतिनिधी**

उल्हासनगर महापालिका आयुक्त विकास ढाकणे यांची उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या उपसचिव पदी नियुक्ती झाली आहे . तर नवीन आयुक्ताच्या नियुक्ती बाबत शहरांत चर्चेला उधाण आले असून अंबरनाथ पालिकेचे प्रशासक डॉ. प्रशांत रसाळ, अतिरिक्त आयुक्त जमीर लेंगरेकर यांच्या नावाची चर्चा जोरात सुरु आहे. उल्हासनगर महापालिका आयुक्त पदी नियुक्त झालेल्या आयुक्तानी सेवेचे ३ वर्ष पूर्ण केले. असे प्रकार क्वचित घडले आहे. आयुक्त विकास ढाकणे यांची गेल्या ऑगस्ट महिन्यात आयुक्त पदी नियुक्ती झाल्यावर, त्यांनी महापालिका प्रशासनावर फक्त ४ महिन्यात पकड निर्माण केली होती. तसेच खुल्या जागेत व रस्त्याच्या बाजूच्या हरितपट्टा तयार करणे, अवैध बांधकामे नियमित करणे, धोकादायक इमारतीचा प्रश्न शासनाकडे लावून धरून आयुक्त व महापौर बंगल्याला प्राधान्य दिले. नवीन महापालिका इमारतीचा आराखडा मंजूर करून घेतला, असुन महापालिकेची स्वतःची पाणी पुरावठा योजना प्रस्तावासाठी पाठपुरावा केला. तसेच विविध विकास कामावर लक्ष केंद्रित केले होते. मात्र अचानक त्यांची उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या उपसचिव पदी नियुक्ती झाली. नवीन आयुक्त पदासाठी अंबरनाथ पालिकेचे तत्कालिन मुख्याधिकारी प्रशासक डॉ प्रशांत रसाळ तसेच महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त जमीर लेंगरेकर यांच्या नावाची चर्चा सुरु झाली आहे.



# ड्रोन प्रणालीमुळे सागरी सुरक्षा होणार भक्कम

## मत्स्यव्यवसाय व बंदर विकास मंत्री नितेश राणे

**मुंबई, दि. ११ : प्रतिनिधी**

राज्यातील सागरी क्षेत्रात होणारी अवैध मासेमारी तसेच घुसखोरी रोखण्यासाठी ड्रोनद्वारे देखरेख विशेष प्रणाली सुरु करण्यात आली आहे. या ड्रोन प्रणालीमुळे राज्यातील 7 जिल्ह्यातील 9 सागर किनाऱ्यांची सुरक्षा आणखी मजबूत होणार असल्याचे मत्स्यव्यवसाय व बंदर विकास मंत्री नितेश राणे यांनी सांगितले. मत्स्य आयुक्त कार्यालयात आयोजित कार्यक्रमात मत्स्यव्यवसाय मंत्री श्री. राणे यांच्या हस्ते ड्रोन देखरेख प्रणालीचे उद्घाटन करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते.




मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या मार्गदर्शनाखाली विभागाचा पहिला 100 दिवसांचा आराखडा तयार केला असल्याचे सांगून मंत्री श्री. राणे म्हणाले की, ड्रोन यंत्रणा कार्यान्वित झाल्यानंतर राज्याच्या 720 किलोमिटर लांबीच्या सागरी किनाऱ्यावरून राज्याच्या 12 मैल सागरी हद्दीपर्यंत बेकायदा मासेमारी करणाऱ्या अवैध नौकांवर ड्रोन कॅमेऱ्याद्वारे नजर ठेवली जाणार आहे. अशा अनधिकृत नौकांची माहिती घेऊन त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करण्यासाठी ड्रोन वेब सोल्युशन्स स्ट्रिमिंगचा पुरावा म्हणून वापर केला जाणार आहे. त्यामुळे अवैध मासेमारीला चाप बसणार आहे. ड्रोन यंत्रणेमुळे राज्यातील सागरीक्षेत्र हे कॅमेऱ्याच्या नियंत्रणात येणार आहे. त्यामुळे अवैध मासेमारीला आळा घालणे शक्य होणार आहे.

राणे म्हणाले, बाहेरून येणाऱ्या ट्रॉलर्स, मोठ्या बोटी, यामुळे स्थानिक मच्छीमारांचे मोठे नुकसान होते. स्थानिकाच्या उत्पन्नात घट होऊन कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्नही निर्माण होतो. त्यावर नियंत्रण मिळावे, जरब बसावी यासाठी आधुनिक तंत्र प्रणालीच्या माध्यमातून सकारात्मक पाऊल उचलण्याच्या दृष्टीने मत्स्य व्यवसाय विभागाने ड्रोन च्या माध्यमातून पहिले पाऊल टाकले आहे. ड्रोन हे सागरी पोलीस विभागाशी समन्वय साधून वापरण्यात येणार असल्याने सागरी सुरक्षा बळकट होण्यास मदत होणार आहे. ड्रोनचा वेग जास्त असल्याने एकाचवेळी अधिक क्षेत्र ड्रोनच्या देखरेखाली येणार आहे. एका दिवसात 120 सागरी मैलाचे सर्वेक्षण करण्यात येईल. तसेच एका दिवसात सहा तास सर्वेक्षण करणे बंधनकारक असेल. ड्रोनमधून प्राप्त झालेली माहिती संबंधित जिल्हा कार्यालयात उपलब्ध करून दिली जाईल. मेक इन इंडिया अंतर्गत हे ड्रोन विकसित करण्यात आले आहे. या माध्यमातून समुद्रात होणाऱ्या हालचालींवर लक्ष ठेवण्यात येणार असून अवैधरित्या मासेमारी करणाऱ्यावर कारवाई करून जास्तीत जास्त दंड आकारला जाणार आहे. या ड्रोनच्या माध्यमातून छायाचित्रे उपलब्ध होणार आहेत. हे सर्व पुरावे विभागास प्राप्त होऊन कारवाई करण्यास गती मिळणार असल्याचे मंत्री श्री. राणे यांनी सांगितले.

केंद्र व राज्य सरकारच्या मत्स्य व्यवसाय कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करण्यात येणार असल्याचेही मंत्री श्री.राणे यांनी सांगितले. समुद्रकिनारा लाभलेल्या राज्यापैकी ड्रोनद्वारे देखरेख प्रणाली विकसित करणारे महाराष्ट्र हे पहिले राज्य असल्याचेही त्यांनी नमूद केले.

यावेळी ड्रोनद्वारे देखरेख प्रणालीचे प्रात्यक्षिक झाले. यासाठी मत्स्य आयुक्त कार्यालय येथे कंट्रोल रूम उभारण्यात आला आहे.

# शिव भोजन केंद्रचालकांचे तीन ते चार महिन्यांचे अनुदान थकले

**पनवेल, दि. ११ : प्रतिनिधी**

पनवेलमधील शिवभोजन केंद्रचालकांचे जवळपास तीन ते चार महिन्यांचे अनुदान थकलेले असल्याने अनुदान कधी मिळेल असा सवाल उपस्थित झाला आहे. पनवेल पुरवठा विभागाकडून होत असलेल्या उशिरामुळे त्यांच्या अनुदानाला विलंब झाला आहे.

शिवभोजन थाळीचा लाभ पनवेल परिसरातील अनेक गोरगरीब नागरिक घेत आहेत. सद्यस्थितीत 10 रुपयांमध्ये शिवभोजन थाळी मिळत आहे. ही योजना पनवेल परिसरात यशस्वी झाली आहे. मात्र तीन ते चार महिन्यांपासून अनुदान शासनाकडून प्राप्त झालेले नसल्याने केंद्र चालकांना तारेवरची कसरत करावी लागत आहे. पनवेल तालुक्यात शहरी भागात १० आणि ग्रामीण भागात नऊ अशी जवळपास १९ केंद्र आहेत. दररोज अंदाजे दोन हजारपेक्षा जास्त थाळींचे प्रत्यक्ष वाटप केले जाते. ग्रामीण भागासाठी 25 रुपये प्रति थाळी आणि शहरी भागासाठी 40 रुपये प्रति थाळी अनुदान मिळते. मात्र सप्टेंबर ते डिसेंबर या महिन्याचे अनुदान मिळण्यासाठी पनवेलच्या पुरवठा विभागाकडून जिल्हा पुरवठा अधिकारी यांच्याकडे बिले वेळेवर पाठवण्यात आले नाहीत. त्याचा फटका केंद्रचालकांना बसत आहे. जिल्हा प्रशासनाकडे पुरेसा निधी असूनही पुरवठा विभागाच्या दिरंगाईमुळे हे अनुदान रखडले आहे.

अनेक शिवभोजन चालक उसनवारी करून केंद्र चालवत आहेत. प्रत्येक महिन्याचे बिल दुसऱ्या महिन्यात अनुदान मिळण्यासाठी पुढे पाठवावे लागते. मात्र तब्बल तीन महिने हे पुढे पाठवले नसल्याने तीन ते चार महिन्याचे अनुदान थकले आहे. पुरवठा विभागाच्या निष्क्रियतेमुळे केंद्र चालकांचे अनुदान थकले असल्याचा आरोप केंद्र चालक करत आहेत.

# महाविद्यालयात वाचन संकल्प महाराष्ट्राचा



**वाडा, दि. ११ : प्रतिनिधी**

उच्च व तंत्र शिक्षण कोकण विभाग व मुंबई विद्यापीठ यांच्या निर्देशनुसार वाडा येथील शिक्षण संचलित शिक्षण संस्थेचे डॉ. शांतीलाल धनाजी देवशी कला महाविद्यालय व वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालयात 'वाचन संकल्प महाराष्ट्राचा' हे अभियान राबवण्यात येत आहे.

या अभियानात सामूहिक वाचन, साखळी वाचन, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी ग्रंथ परीक्षण, ग्रंथ दिंडी, वाचन विषयक पथनाट्य, वृत्तपत्र विश्व आणि वाचन संस्कृती, ग्रंथ प्रदर्शन, विज्ञान ग्रंथ वाचन( विद्यार्थ्यांद्वारे), विद्यार्थ्यांचे ग्रंथ परीक्षण अशा विविध कार्यक्रमांचे आयोजन केले आहे.

सदर अभियानाचा उद्घाटन सोहळा महाविद्यालयातील सेमिनार हॉलमध्ये संपन्न झाला. दिवसेंदिवस वाचनाचा टक्का घटत आहे. डिजिटल माध्यमांमुळे विद्यार्थी विविध प्रकारच्या जीवन उपयोगी ग्रंथांपासून दूर जात आहेत. ही वाचन संस्कृतीच्या दृष्टीने चिंतेची बाब आहे. सर्वांगीण विकास साधायचा असेल तर मानवास वाचनाला पर्याय नाही, असे महाविद्यालयाच्या प्राचार्या प्रा. डॉ. किशोरी भगत यांनी यावेळी बोलताना सांगितले.

अभियानाचे नियोजन महाविद्यालयातील नवीन शैक्षणिक धोरण 2020 कक्षचे प्रमुख प्रा. डॉ. कैलास जोशी( प्रमुख मराठी विभाग) यांनी केले असून या अभियानात सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी सहभागी होत आहेत. ही वाचन संस्कृतीच्या दृष्टीने आनंदाची बाब आहे, असे प्रा. जोशी यांनी सांगितले.

# दिव्यांग व ज्येष्ठ नागरिकांनी साहित्य मिळण्यासाठी नोंदणी करण्याचे महापालिकेचे आवाहन

**उल्हासनगर, दि . ११ : प्रतिनिधी**

समाज कल्याण विभाग जिल्हा परिषद ठाणे व भारतीय कृत्रिम अंग निर्माण निगम(अलिम्को) यांच्या संयुक्त विद्यमानाने उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रातील दिव्यांग व जेष्ठ नागरीकांनी शासनाचे साहित्य मिळण्यासाठी लाभार्थ्यांच्या नावाची नोंद करण्यात येणार असुन सर्व नागरीकांनी १३ जानेवारी २०२५ रोजी सदर नोंदणी कार्यक्रमात उपस्थित राहण्याचे आवाहन मनपा जनसंपर्क अधिकारी छाया डांगळे यांनी येथील जनतेला केले आहे.

दिव्यांग प्रमाणपत्र धारक व ६० वर्षावरील ज्येष्ठ नागरीक यांना अवाहन करण्यात येते की,सोमवार १३जानेवारी रोजी सकाळी१० ते ४ या वेळेत रोटरी मिटाऊन हॉल,गोल मैदान, उल्हासनगर-२ येथे ADIP योजने अंतर्गत दिव्यांगजनांना व RVY योजने अंतर्गत जेष्ठ नागरीकांना खालील साहित्य मिळणार आहे अस्थिव्यंग,बहुविकलांग,सेरेबल पाल्सी, कर्णबधिर,पुर्णतःअंध ADIP योजने अंतर्गत अपंग व्यक्तींसाठी तीनचाकी सायकल,व्हिल चेअर,बॅटरीवर चालणारी मोटाराइज्ड तीनचाकी सायकल,कुबड्या

वॉकींग स्टिक,सीपी चेअर,बीटीई श्रवणयंत्र,बेल केन,ब्रेल,स्लेट,ब्रेल किट,सुगम्य केन,स्मार्ट फोन,कृत्रिमअवयव,कॅलिपर इत्यादी साहित्य मिळणार आहेत.तसेच A ADIP योजनेअंतर्गत दिव्यांगजनांनी या योजनेचा लाभ घेण्यासाठी अपंगत्व दर्शविणारे एक फोटो आधारकार्ड,आधार नोंदणी पावती UDID कार्ड किंवा अपंगत्व प्रमाणपत्र किमान४० टक्के व UDIDसाठी नोंद केलेली नोंद पावती,उत्पन्नाची प्रत (सर्व श्रोताकडून मासिक उत्पन्न रू.२२५०० पेक्षा जास्त नसावे.महसूल विभाग,बीपीएल रेशनकार्ड प्रत अपंग पेशन प्रमाणपत्राची प्रत खासदार,आमदार,जिल्हा परिषद,ग्रामप्रधान सरपंच इ.प्रमाणपत्र दृष्टीहीन लाभार्थ्यांनी शैक्षणिक नांव नोंदणीचा पुरावा शाळा सोडल्याचा दाखला, बोनाफाईड ६० वर्षावरील जेष्ठ नागरीक RVY योजने अंतर्गत ज्येष्ठ नागरिकांना व्हिलचेअर,कमोडसह व्हिलचेअर,कमोड खुर्च्या, कुबड्या,चालण्याची काठी,ट्रायपॉड,टेट्रापॉड,चष्मा,बीटीई श्रवणयंत्र,ग्रीवा कॉलर,गुडघा बेस,डेन्चर,एल. एस.बेल्ट इत्यादी साहित्य मिळणार असुन त्यासाठी जेष्ठ नागरीकांनी एक छायाचित्र,आधारकार्ड,आधार नोंदणी पावती,उत्पन्नाची प्रत(सर्व श्रोताकडून मासिक उत्पन्न रु१५००० जास्त नसावे.तरी सर्व दिव्यांग व ज्येष्ठ नागरीकांना आवाहन करण्यात येते की,आपण सदर योजनेचा लाभ घ्यावा. यासाठी सदर दिवशी फक्त लाभार्थ्यांची नोंदणी करण्यात येणार असल्याची माहिती उल्हासनगर महानगरपालिकेच्या जनसंपर्क अधिकारी छाया डांगळे यांनी प्रसिद्धिस दिलेल्या पत्रकाद्वारे दिली आहे.

# विभागीय लोकशाही दिन 13 जानेवारी 2025 रोजी

**नवी मुंबई, दि . ११ : प्रतिनिधी**

कोकण विभागीय स्तरावरील लोकशाही दिन सोमवार दि. 13 जानेवारी 2025 रोजी सकाळी 10.00 वाजता कोकण भवनातील विभागीय आयुक्त कार्यालयाच्या समिती सभागृह, 1 ला मजला, कोकण भवन, नवी मुंबई येथे आयोजित करण्यात आला आहे. लोकशाही दिनाच्या बैठकीस सर्व विभागीय स्तरावरील प्रमुख अथवा त्यांचे प्रतिनिधी यांनी उपस्थित असणे आवश्यक आहे. काही अपरिहार्य कारणामुळे उपस्थित राहणे शक्य नसल्यास त्यांनी विभागीय आयुक्त यांची परवानगी घेणे आवश्यक आहे. असे कोंकण विभागाचे अपर आयुक्त (सामान्य प्रशासन) संजीव पलांडे यांनी कळविले आहे.

# केजरीवाल नायक की खलनायक?




देशाची राजधानी असलेल्या दिल्ली विधानसभेसाठी येत्या ५ फेब्रुवारीला मतदान होणार आहे. दिल्लीत गेली दहा वर्षे सलग सत्तेवर असलेला आम आदमी पक्ष विरुद्ध केंद्रात सत्तेवर असलेला भारतीय जनता पक्ष यांच्यात थेट लढाई आहे. आपचे सर्वेसर्वा अरविंद केजरीवाल विरुद्ध पंतप्रधान नरेंद्र मोदी असे या निवडणूक युद्धाला स्वरूप प्राप्त झाले आहे. भाजपाने आपला मुख्यमंत्रीपदाचा उमेदवार जाहीर केलेला नाही. निवडणुकीत तिसरा खेळडू काँग्रेस पक्ष असला तरी विधानसभेत खाते उघडण्यासाठी काँग्रेसला हातपाय मारावे लागत आहेत.

दिल्लीत सध्या कडाक्याची थंडी आहे. झोंबरे वारे वाहत असतानाही राजकीय वातावरण मात्र गरम आहे. भाजपा विरुद्ध आप संघर्षात एकमेकांवर आरोप-प्रत्यारोपाने कळस गाठला आहे. आप सत्तेची हॅटट्रीक संपादन करण्यासाठी झटत आहे, तर केजरीवाल यांना खलनायक ठरवून भाजपा तब्बल २७ वर्षांनंतर दिल्लीची सत्ता खेचू पाहत आहे. राजधानीतील एक कोटी पंचावन्न लाख मतदार दिल्लीचा मुकुट कोणाच्या मस्तकावर चढवणार हे ८ फेब्रुवारीला मतमोजणीनंतर स्पष्ट होईल.

निवडणुकीच्या कार्यक्रमाचा बिगुल वाजले आणि आप, भाजपा व काँग्रेस पक्ष यांच्या प्रचाराला जोर चढला. सभा, मिरवणुका, घरोघरी मतदारांच्या भेटी, रेवड्यांची खैरात आणि आश्वासनांचा भडीमार सुरू झाला आहे. दिल्लीकर मतदारांना आकर्षित करण्यासाठी तीनही राजकीय पक्षांत चढाओढ लागली आहे. गेल्या दहा वर्षांत आप सरकारने दिल्लीकरांना मोफत सेवांची सवय लावली. सरकारी शाळांचा कायाकल्प केला. अतिशय सुंदर, प्रशस्त व दर्जेदार शाळा विद्यार्थ्यांना आकर्षित करू लागल्या. खासगी शाळांच्या तोडीस तोड उत्तम शाळा उभारण्याचे प्रयत्न आप सरकारने केले. मोहल्ला क्लिनिक उभारून दिल्लीतील कानाकोपऱ्यांतील हजारो सर्वसामान्य लोकांना औषधोपचार सेवा उपलब्ध करून दिली. दोनशे युनिटपर्यंत मोफत वीज देण्याचे कामही आपने केले. महिलांना मोफत बस सेवा आणि ज्येष्ठांना मोफत तीर्थयात्रा या घोषणांमुळे आपची व्होट बँक वाढेल असे वातावरण दिल्लीत आहे. मध्य प्रदेशमध्ये तत्कालीन भाजपाचे मुख्यमंत्री शिवराजसिंग चौहान यांची लाडकी बहीण योजना सुपर हिट ठरली व भाजपाला महिलांनी या राज्यात पुन्हा सत्ता मिळवून दिली. महाराष्ट्रातही महायुतीने विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर लाडकी बहीण योजना जाहीर केली व तमाम महिला वर्गाने महायुतीला पुन्हा सत्ता मिळवून दिली. देशात आठ राज्यांत लाडकी बहीण योजना क्लीक झाली आहे. भाजपाची योजना केजरीवाल यांनी दिल्लीत पळवली आणि त्यांनी महिलांना दरमहा २१०० रुपये देण्याचे आश्वासन दिले. ज्येष्ठांना मोफत औषधोपचार तसेच ऑटो रिक्षाचालकांना १० लाखांपर्यंत विमा आणि मंदिराच्या पुजाऱ्यांना व गुरुद्वारातील ग्रंथींना दरमहा १८ हजार रुपये मानधन देण्याची घोषणा केली. आपने निवडणुकीच्या तोंडावर मतदारावर रेवड्यांचा वर्षाव केला म्हणून टीका करणार तरी कोण? कारण भाजपाही तेच करीत आहे व अन्य राज्यात रेवड्या उधळूनच भाजपाने सत्ता प्राप्त केली आहे. आपच्या घोषणा घराघरांपर्यंत प्रभावीपणे पोहोचवल्या जात आहेत. त्यामुळे सलग दहा वर्षे सत्तेवर राहूनही, आपच्या दिग्गजांवर भ्रष्टाचाराचे आरोप होऊनही आणि आपचे चार बडे नेते जेलमध्ये जाऊनही त्याची धार रेवड्यांच्या वर्षावाने सौम्य होते का, हे या निवडणुकीत बघायला मिळेल.

गेल्या दहा वर्षांत दिल्लीत विकासकामांचा दिखाऊपणा वाढला आहे. भिंतींवर घोषणांची रंगरंगोटी वाढली आहे. कामापेक्षा जाहिरातबाजी वेगवान आहे. दिल्लीत वायुप्रदूषणाने टोक गाठले आहे. लहान मुले, महिला व ज्येष्ठांना हवा प्रदूषणाने आजाराला सामोरे जावे लागते आहे. रेल्वे व विमानसेवा खराब हवेमुळे विस्कळीत आहे. रोज सकाळी उशिरापर्यंत दिल्लीला प्रदूषित हवेने वेढलेले असते. यमुना नदी प्रदूषित आहे. दिल्लीकरांना प्यायला शुद्ध पाणी मिळत नाही हे मोठे दुर्दैव आहे. मोठा भ्रष्टाचार झाल्याने चांगले दर्जेदार रस्ते होत नाहीत, म्हणून लोकांमध्ये नाराजी आहे. माजी मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल, उपमुख्यमंत्री मनीष सिसोदिया, मंत्री सत्येंद्र जैन असे दिग्गज नेते जेल रिटर्न असून ते सध्या जामिनावर आहेत. मद्यविक्रीतील कोट्यवधींच्या घोटाळ्याने आप सरकारची प्रतिमा डागाळली आहे. मुख्यमंत्र्यांचे निवासस्थान असलेल्या शीशमहालवर सुशोभीकरणाच्या नावाखाली ३३ कोटी रुपये खर्च झाल्याचा ठपका कॅगने ठेवल्याने आपला उतरती कळा लागली आहे. या सर्वांचा परिणाम मतदारांवर किती होईल, त्यावर सत्ता कोण काबीज करणार हे ठरणार आहे.

दिल्लीतील आपच्या चढत्या आलेखाला यावेळी ब्रेक लागणार का, भाजपाची ताकद आपला सत्तेपासून रोखणार का, हा या निवडणुकीत कळीचा मुद्दा आहे. समाजसेवक अण्णा हजारे यांच्या लोकपाल चळवळीतून केजरीवाल यांचा चेहरा पुढे आला. स्वच्छ चारित्र्याचा आणि भ्रष्टाचाराविरोधात लढणारा नेता अशी त्यांची सुरुवातीला प्रतिमा होती. त्यावर विश्वास ठेऊनच केजरीवाल यांच्याकडे जनतेने दिल्लीची सत्ता सोपवली. सन २०१३ ची विधानसभा निवडणूक आपने प्रथमच लढवली आणि या पक्षाचे ७० पैकी २८ जण आमदार म्हणून निवडून आले. आपच्या यशाने तेव्हाच काँग्रेस व भाजपाला मोठे आश्चर्य वाटले. त्या निवडणुकीत भाजपा हा सर्वात मोठा पक्ष निवडून आला होता. पण भाजपाला सत्ता मिळू नये म्हणून काँग्रेसने आपला पाठिंबा दिला व केजरीवाल यांनी पहिल्यांदा मुख्यमंत्री म्हणून शपथ घेतली. आपचे हे पहिले सरकार अवघे ४९ दिवस टिकले. केजरीवाल यांनी जनलोकपाल विधेयक आणायचे ठरवताच काँग्रेसने पाठिंबा काढून घेतला व केजरीवाल यांना राजीनामा देणे भाग पडले. दिल्ली विधानसभेची निवडणूक २०१५ मध्ये झाली तेव्हा मात्र ७० जागांपैकी ६७ जागांवर आपचे उमेदवार निवडून आले व आपने ऐतिहासिक विजय प्राप्त केला. सन २०२० मध्ये झालेल्या विधानसभा निवडणुकीत दिल्लीच्या ७० पैकी ६२ जागांवर विजय मिळवून दिल्लीवर आपचे वर्चस्व कायम असल्याचे केजरवाल यांनी दाखवून दिले.

**राष्ट्रनामा**



**सुकृत खांडेकर**
०९५९४२२४०००
sukritforyou@ gmail.com

गेल्या तीन विधानसभा निवडणुकांमध्ये चर्चा आपचीच होती व दिल्लीकरांची पसंतीही आपलाच होती. आता मात्र राजकीय वातावरण खूप बदलले आहे. ज्यांनी भ्रष्टाचाराच्या मुद्द्यावर अण्णा हजारेंच्या मंचावर जाऊन आंदोलन केले, तेच महाभ्रष्टाचारी आहेत असा प्रचार भाजपाने चालवला आहे. भ्रष्टाचाराच्या मुद्द्यावरून केजरीवाल व त्यांच्या चमुला भाजपाने घेरायला सुरुवात केली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी हे स्वत: भाजपाच्या प्रचारासाठी मैदानात उतरल्यामुळे आपचेही धाबे दणाणले आहेत. मद्य विक्रीत झालेला महाभ्रष्टाचार, आपच्या चार नेत्यांना घडलेला तुरुंगवास, उपराज्यपालांशी आप सरकारचा सतत चाललेला संघर्ष या निवडणुकीत केजरीवाल यांना महाग पडू शकतो.

दिल्लीच्या निवडणुकीत इंडिया आघाडीतले मतभेद चव्हाट्यावर आले आहेत. २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत आपने काँग्रेसशी युती केली होती. दिल्लीत आपने ३ तर काँग्रेसने ४ लोकसभा मतदारसंघ लढवले. पण सातही जागांवर इंडियाचा पराभव झाला व मतदारांनी सातही मतदारसंघांतून भाजपाचे खासदार लोकसभेवर पुन्हा निवडून दिले. त्यामुळे काँग्रेसबरोबर युती म्हणजे आपले नुकसानच आहे हे केजरीवाल यांना कळून चुकले. म्हणूनच दिल्लीत आप स्वबळावर लढत असून आप आणि काँग्रेसचे उमेदवार एकमेकांच्या विरोधात रिंगणात उतरले आहेत. तृणमूल काँग्रेसच्या सर्वेसर्वा व पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी आणि समाजवादी पक्षाचे प्रमुख अखिलेश यादव या इंडियातील मित्रपक्षांनी दिल्ली निवडणुकीत आम आदमी पक्षाला पाठिंबा जाहीर केला आहे. आप विरुद्ध काँग्रेस हा संघर्ष भाजपाच्या पथ्यावर पडणारा आहे.

केजरीवाल तीन वेळा मुख्यमंत्री झाले, सलग दहा वर्षे दिल्लीत आप सत्तेवर आहे. मग दिल्ली हे विकासाचे मॉडेल का होऊ शकले नाही? मोफतच्या सेवा आणि रेवडी कल्चर आणि आता लाडकी बहीण योजनेचा केजरीवाल यांना का आधार घ्यावा लागतो? दिल्लीवरील आपदा या निवडणुकीत हटवा असे आवाहन पंतप्रधानांनी दिल्लीच्या मतदारांना केले आहे. म्हणूनच यंदाची निवडणूक ही आपला कठीण परीक्षा आहे. केजरीवाल हे नायक की खलनायक याचा कौल दि. ८ फेब्रुवारीला जाहीर होणार आहे.

# स्नेह वाढवणारी 'मकर संक्रांत'

असे म्हणतात प्रेमाने जग जिंकता येते. जिथे सर्व शस्त्रांचा प्रभाव संपतो तिथे प्रेमाचे शस्त्र कामी येते. श्रीकृष्णानेही गीतेमध्ये प्रेमाची महती वर्णिली आहे. आपल्या संपूर्ण अवतारकार्यातही भगवंताने प्रेमाचे महत्व आपल्या वर्तणुकीतून प्रसंगांतून दाखवून दिले आहे. भारतीय हिंदू संस्कृतीने तर प्राणिमात्रापासून अगदी निर्जीव वस्तुवरही प्रेम करायला शिकवले आहे. अशा या प्रेमाची शिकवण देणारा वर्षातील पहिला सण म्हणजे मकर संक्रांत. तिळगुळाच्या माध्यमातून प्रेमाची देवाणघेवाण करण्यास शिकविणारी मकरसंक्रांत भारतीय संस्कृतीचे एक आगळे वैशिष्ट्य आहे. या दिवशी सूर्य मकर राशीत प्रवेश करतो म्हणजेच सूर्याचे उत्तरायण सुरु होते. हा काळ अत्यंत शुभ मानला जातो. शरपंजरी पहुडलेल्या पितामह भीष्मांनीही प्राण त्यागण्यासाठी उत्तरायण सुरु होण्याची वाट पाहिली होती. हिंदू धर्मातील हा एकमेव सण आहे जो शालिवाहन वर्षानुसार साजरा न करता सौर कालगणनेनुसार साजरा केला जातो. यंदाच्या मकर संक्रांतीचे विशेष महत्व असणार आहे. १४४ वर्षानंतर प्रयागराज येथे संपन्न होणाऱ्या महाकुंभाचे प्रथम शाहीस्नान मकर संक्रांतीच्या दिवशी केले जाणार आहे.



भारत हा कृषिप्रधान देश असल्याने या सणाला शेतीविषयक महत्वही आहे. आपल्या शेतात आलेले धान्य या दिवशी सुवासिनी स्त्रिया एकमेकींना वाण म्हणून देतात. याचेच रूपांतर आता हळदी कुंकू समारंभात झाले असून शहरी भागांत स्त्रिया वेगवेगळ्या वस्तू वाण म्हणून देतात. लहान मुलांपासून वयोवृद्धांपर्यंत सर्वांना तिळगुळाच्या लाडूप्रमाणे प्रेमाच्या नात्यात घट्ट बांधण्याची प्रेरणा देणारा हा सण स्नेहाचे आणि प्रेमाचे आगळे महत्व सांगून जातो. एकमेकांना तिळगुळ देताना 'आमचा तिळगुळ सांडू नका, आमच्याशी भांडू नका' असे बजावून वर्षभर परस्परांशी स्नेहाने वागण्याचा जणू करारच या दिवशी केला जातो. आमच्या लहानपणी मोठ्यांना तिळगुळ देऊन त्यांचे शुभाशीर्वाद घेताना पाठीवर पडणारी थाप आम्हा बच्चे कंपनीला वेगळाच आनंद देऊन जाई. तिळगुळ वाटूनही तिळगुळाची वाटी द्रौपदीच्या थालीप्रमाणे भरलेलीच असे. कारण जेव्हढे तिळगुळ दिले जायचे तेव्हढेच पुन्हा वाटीत यायचे. तिळगुळ वाटण्याच्या निमित्ताने जेष्ठ मंडळींकडून होणारे लाड आणि मिळणारे आशीर्वाद आम्हाला ऊर्जा देत असत.

हे स्निग्ध असतात. स्निग्ध म्हणजेच स्नेह. या स्नेहाचे गुळासोबत मिश्रण करून ते घट्ट केले जाते. एकमेकांतील स्नेहाचे नाते असेच घट्ट राहावे यासाठीच मकर संक्रातीच्या दिवशी प्रतीकात्मक तिळगुळ एकमेकांना दिला जातो. तीळ हे उष्ण असल्याने थंडीच्या दिवसांत शरिरातील उष्णता वाढवण्याचे महत्वाचे कार्य करतात त्यासोबत मिश्र केलेला गुळ स्नेहाच्या नात्यातील गोडवा दिवसागणिक वाढत जाण्याची प्रेरणा देतो. मकर संक्रांतीनंतर रथ सप्तमीपर्यंत स्त्रिया घरोघरी किंवा सार्वजनिक ठिकाणी हळदी कुंकू साजरा करतात. एरव्ही एकमेकांशी भांडणाऱ्या, एकमेकांची उणीधुणी काढणाऱ्या स्त्रिया वर्षभरातील सारे हेवेदावे विसरून हळदी कुंकू साजरा करण्यासाठी एकत्र येतात. एकमेकींना हळद कुंकू लावून पस्परांतील शक्तीचे पूजन करतात. प्रेमाचे प्रतीक म्हणून तिळगुळासोबत वाण देतात. मकर संक्रांत हा सण भारताच्या विविध प्रातांसह नेपाळमध्येही उत्साहाने साजरा केला जातो. प्रत्येक ठिकाणी सण साजरा करण्याच्या पद्धती जरी भिन्न असल्या तरी एकमेकांमध्ये प्रेमाची देवाणघेवाण करणे हाच या सणाचा प्रमुख उद्देश आहे. सध्याच्या धावत्या जगात आपल्या पाल्याचा निभाव लागावा यासाठी पालक आपल्या पाल्यांना इंग्रही माध्यमांच्या किंवा कॉन्व्हेंट शाळांमध्ये घालू लागली आहेत. कॉन्व्हेंट आणि इंग्रजी माध्यमातून शिक्षण घेणाऱ्या आजच्या पिढीवर पाश्चात्य संस्कृतीचा प्रभाव मोठ्या प्रमाणात झालेला पाहायला मिळतो. प्रेम व्यक्त करण्याचे दिवस आणि साधनेही आज बदलली आहेत. परंपरागत सणांची जागा आज निरनिराळ्या 'डेज'ने घेतली आहे. हातभर रिबिनी बांधून आणि अंगावर पेनाने रंगवून, चॉकलेट आणि गुलाबाची फुले वाटून प्रेम दर्शवणारी नवीन पिढी सर्वत्र पाहायला मिळते आहे. ज्या पिढीमध्ये जेष्ठांसाठी केवळ 'मदर्स डे' आणि 'फादर्स डे' तेव्हढे शिल्लक राहिले आहेत. अशा पिढीला मकरसंक्रांतीतील तिळगुळाचा गोडवा कदाचित कळणारही नाही. त्यांच्यावर आपल्या सणांचे आणि संस्कृतीचे महत्व बिंबवणे आज आवश्यक बनले आहे.

# तिळगुळ घ्या... गोड गोड बोला...!!

भारतीय संस्कृतीत सणांना अतिशय महत्व आहे. प्रत्येक सण विशिष्ट असा संदेश देत असतो. या सणातून एक वेगळीच प्रेरणा मिळत असते. मकर संक्रात हा त्यापैकीच एक सण. मकर संक्रात हा वर्षातील पहिला सण त्यामुळे या सणाचा उत्साह काही निराळाच असतो. मकर संक्रांत हा सण संपूर्ण देशात वेगवेगळ्या नावाने आणि वेगवेगळ्या पद्धतीने साजरा केला जातो. आपल्या महाराष्ट्रात तर या सणाला खूप महत्व दिले जाते. मकर संक्राती म्हणजे सूर्याने मकर राशीत प्रवेश करणे. सूर्य ज्या दिवशी दक्षीयणातून उत्तरायणात मार्गक्रमण करतो त्या तिथीला मकर संक्रांत साजरी केली जाते. ही तिथी कधी १४ जानेवारीला येते तर कधी १५ जानेवारीला येते. यावर्षी ही तिथी १४ जानेवारीला आली आहे. संक्रात ऐन थंडीत येते त्यामुळे हवेत गारवा असतो त्याचा परिणाम आपल्या प्रकृतीवर होतो. त्यामुळे या दिवसात शरीराला उष्ण ठेवण्यासाठी उष्ण पदार्थ खाल्ले जातात. तीळ आणि गूळ यात उष्मांक अधिक प्रमाणात असतो. कदाचित त्यामुळेच मकर संक्रांतीच्या दिवशी तिळगुळ वाटला जातो. संक्रातीच्या दिवशी तीळ आणि गूळ यांच्या वड्या किंवा लाडू एकमेकांना देण्याची पद्धत आहे. तिळगुळ देताना तिळगुळ घ्या गोड गोड बोला असा संदेशही दिला जातो. एकमेकांविषयी स्निग्धता देणारे तीळ आणि गोडवा देणारा गूळ एकत्र आल्याने प्रेमाचे नाते टिकते असे प्रतिकात्मक रूपही या सणाला आहे. एकमेकांशी असलेली कटुता भांडण विसरून एकत्र येण्याचा संदेश देणारा हा सण आहे. मकर संक्रातील विवाहित स्त्रिया एकमेकांना हळदी कुंकू लावून सौभाग्याचे वान देतात. हे सर्व करण्यामागे कोणतीही रूढी परंपरा नसून नव्याने स्वागत आणि त्यातून आनंद घेणे हा आहे.



**श्याम बसप्पा ठाणेदार**
**दौंड, जिल्हा पुणे**
**९९२२५४६२९५**

पूर्वी स्त्रियांना एकत्र येण्याची संधी क्वचितच मिळत असे या सणानिमित्त महिला एकत्र येत असे. आजच्या धकाधकीच्या जीवनातही महिलांना एकत्र येण्याची संधी क्वचितच मिळते त्यामुळे संक्रातीनिमित्त मिळणारी ही आयती संधी महिलावर्ग सोडत नाहीत. मकर संक्रात हा सण महिलांचा सण असे मानले जात असले तरी लहान मुलेही या सणाची आतुरतेनं वाट पाहत असतात. मकर संक्रांतीच्या दिवशी पतंग उडवण्याची परंपरा आहे. अनेक गावात पतंगोत्सव आयोजित केला जातो. या दिवशी आकाशात विविध रंगांची, आकाराची पतंगे उडताना दिसतात. पतंगाचे विविध आकार रंग पाहून मन प्रसन्न होते. एकमेकांशी असलेली कटुता विसरून प्रेमाने वागा असा संदेश देणारी मकर संक्रात म्हणजे आनंदाची पर्वणीच. मकर संक्रांतीच्या सर्वांना हार्दिक शुभेच्छा! तिळगुळ घ्या गोड गोड बोला!!

## सेवेतून देवाचे आशीर्वाद मिळतात : संत राजिंदर सिंह जी महाराज



मानव महान कार्य करतो त्यापैकी इतरांची सेवा करणे हे कार्य होय. संत कृपाल सिंह महाराज नेहमी म्हणतात देत रहा, देत रहा, देत रहा. अनेकजण आपल्याकडील प्राप्त वस्तू देताना चिंतीत असतात कारण त्याची अशी समजूत असते की दिल्याने आपल्याला कमतरता भासेल. त्यांना ठाऊक नसतं कि सृष्टिच्या विपुलतेच्या नियमानुसार ( law of abudance ) मोठ्या मनाने आणि कृतज्ञता भावनेने इतरांना दिलेली गोष्ट अथवा वस्तू ती कोणत्याही अन्य मार्गाने आपल्याचकडे परत येते. जेंव्हा आपण देतो तेंव्हा आपला कधीच तोटा होत नाही. अशीही शक्यता असते की एखाद्या गरजू व्यक्तीस मदत करण्याची संधी मिळते, त्याग करण्याची संधी, त्यानुसार आपण दिलेली वस्तू आपल्याला परत मिळाली असेल, किंवा परिस्थिती बदललेली असेल, किंवा ती वस्तू देण्याची गरजच वाटली नसेल. तरी सुद्धा दुसऱ्यांची सेवा करण्यामुळे समाधानाचे जे बक्षीस मिळते तेंव्हा आपल्याला जाणवतं की आपल्यावर प्रभु कृपेचा वर्षाव होत आहे. आपण देवाचे आभार मानतो की आपण स्वार्था ऐवजी सेवाभावाची निवड केली.

इतरांना देण्यासारखी अन्य कोणतीही प्रसन्नता नाही. जे निस्वार्थ भावनेने देतात त्यांना कळून चूकते की देण्याने कधीच नुकसान होत नाही. न मागता भरभरून कृपेचा वर्षाव आपल्यावर होत असतो आणि आपल्या आत्म्याचे परमात्म्याशी एकरुप होण्याचे ध्येय कमी कालावधीत प्राप्त करू शकतो. आपल्या हृदयात प्रभू प्रेमाची भर पडते. सेवा करण्यामुळे आपल्याला मिळालेल्या प्रेरणेतून आपण अध्यात्मिक मार्गावर वेगाने प्रगती करू शकतो.

## स्वराज्य जननी राजमाता जिजाऊ

मराठी राज्याचे संस्थापक...
छत्रपती शिवाजी महाराजांची जिजाऊ
मराठ्यांच्या स्वातंत्र्याचा पाया तिनेच घातला,
ऐतिहासिक सत्य आहे, स्वराज्य जननी
राजमाता जिजाऊ...
छत्रपती शिवाजींच्या शुद्ध चरित्रांची
जडणघडण घडविणारी जिजाऊ
हिंदवी स्वराज्य बनविण्यास,
सिंहाचा् वाटा असलेली, स्वराज्य जननी
राजमाता जिजाऊ...
तलवार चालविणे, भालाफेक
घोडेस्वारी करणारी जिजाऊ
रयतेचे संरक्षण कसे करावे,
शिवबाला शिकवणारी, स्वराज्य जननी
राजमाता जिजाऊ...
सत्य, शाश्वत, नियमित..
धर्मपालनाचे धडे देणारी जिजाऊ
मन वात्सल्यमय, करुणामय,
इतरांसाठी झीजणारी, स्वराज्य जननी
राजमाता जिजाऊ...
हिंदवी स्वराज्याची स्थापना
हेच धैर्य बाळगणारी जिजाऊ
समाजाला जागृत करून,
ज्ञानसंपन्न करणारी, स्वराज्य जननी
राजमाता जिजाऊ...
आपल्या प्रभावी वाणीने...
प्रेतातही प्राण ओतणारी जिजाऊ
मावळ्यात चैतन्याचा प्रभाव,
आधाराचा हात देणारी, स्वराज्य जननी
राजमाता जिजाऊ...
रांधा, वाडा, उष्टी काढा
यापेक्षा थोर आदर्श देणारी जिजाऊ
दिव्यत्वाचे, बाळ संगोपन,
स्त्री मुक्त असावी सांगणारी, स्वराज्य जननी
राजमाता जिजाऊ...
प्रचंड प्रेम, जन्मजात जिव्हाळा
रयतेचा सांभाळ, प्रेरणा देणारी जिजाऊ
माता म्हणून मुलावर जीव ओतणारी
जिवापाड काळजी घेणारी, स्वराज्य जननी
राजमाता जिजाऊ...
डावपेच, गनिमी कावा, तर्क
बिन भिंतीच्या शाळेत शिकवणारी जिजाऊ
कर्तृत्वशक्ती, सहनशीलता
धडपडणार नेतृत्व होती, स्वराज्य जननी
राजमाता जिजाऊ....
भूतकालीन, भविष्यकालीन...
अद्वितीय पुत्राला जन्म देणारी जिजाऊ
शिस्तीखाली संघर्षमय, सतचरित्र
छत्रपती भारताला देणारी, स्वराज्य जननी
राजमाता जिजाऊ...
अपत्य धारणा, अपत्य संगोपन
नेतृत्वाच उत्तम आदर्श जिजाऊ
बलवान शूरवीर छत्रपती ही बनविता येतो
हेच दाखवून देणारी, स्वराज्य जननी
राजमाता जिजाऊ....

**सौ चैताली संगोपाल वरघट**
**मूर्तिजापूर, जि अकोला**
**९८३४५८३६८५**

# महात्मा गांधीचा जगावरील प्रभाव

**डॉ.प्रीती जेम्स (एन ए),**
**पुणे**
**मोबाईल क्र : ९९८७५३०८६८**

एका माणसाने दुसऱ्या माणसाच्या डोक्यात दगड घालुन खुन केला मरणारा तर मेलाच पण मारणाराही मेला पण तो दगड तिथंच पडलाय जगाला ओरडून सांगतोय की मी किती पराक्रम केलाय दोघांचाही जीव घेतलाय. सावधान !!! समाजात असे काही दगड आहेत की जे आपल्याला भांडायला लावतात एकमेकांची डोकी फोडायला लावतात नुकसान भांडण करणाऱ्याचे होते भांडणारे विकोपाल गेले तर बरबा होतात करणारे पण दगड बाजुला होतात. भारत हा असा एकमेव देश आहे की इथल्या तरुणांना आणि जनतेला स्वत:च्या भविष्यापेक्षा नेत्याच्या भविष्याची चिंता जासत आहे .समाजात बदल का घडत नाहीत ? तर गरिबांकडे हिंमत नसते, मध्यमवर्गीयांना फुरसत नसते आणि श्रीमंतानाा गरज नसते . सुशिक्षीत भारतीयांची मनं दगडासारखी झाली आहे ही फार मोठी चिंतेची बाब आहे . हे महात्मा गांधीचे विधान १९२९ सालचे आहे ते आजही लागू पडते . जो तो आपल्या पोळीवर तुप ओढण्याच्या नादात सुख ओरबाडण्याचा प्रयत्न करत आहे आणि सुख ओरबाडण्याची ब्रुत्ती समाजाला विषमतेकडे नेते आणि विषमतेसोबत हिंसा येतेच हळुहळु संपुर्ण मानवजातच त्यामुळे धोक्यात येते.विश्वातील मानवजाचे प्रश्न सोडवण्यासाठी शांततेसाठी युदध हा काळ येवु नये म्हणुन गांधीचे विचारच या स्थितीला तारतील काय ? चला आपणही थोडा सकारात्मक विचार करु या! माझे जीवन हाच माझा संदेश आहे या विचारांनी आपलं अखंड आयुष्य ज्या मनुष्याने अर्पिले त्या हुत्माम्याचे स्मरण करणे आजच्या युगासाठी आवशकच आहे असे मला वाटते . महात्मा गांधी लहानपणापासुन सत्याचे उपासक होते . त्याच्या बाबतीत ती अत्यंत सहज अशी गोष्ट होती .भक्तीयुक्त अंत:करणाने केलेल्या शोधाअंती 'ईश्वर सत्य आहे या प्रचलित सुत्राऐवजी सत्य हाच परमेश्वर हे वस्तुस्थितीचे मर्म प्रकट करणारे सुत्र त्यांना मिळाले त्याच्या जीवनावर सखोल परिणाम करणारे आधुनिक पुरुष तीन आहेत .रायचंदभाईनी आपल्या प्रत्यक्ष सहवासाने, टॉलस्टायचे 'स्वर्ग तुझ्या हुदयात आहे'( द किंग्डम ऑफ गॉड विवीन यू) नावाच्या पुस्तकाने आणि रस्कीनने सर्वोदय (अन टू धिस लास्ट) या पुस्तकाने म.गांधींना मुग्ध केले आहे.

सर फिरोजशहा मेहता म.गांधीना हिमालयासारखे वाटले लोकमान्य समुद्रासारखे भासले तर गोखले गंगेसारखे वाटले . या गंगेत त्यांना स्नान करता येण्यासारखे होते. हिमालय चढून जाणे अशक्य समुद्रात बुडण्याची धास्ती पण गंगेच्या मांडीवर खुशाल क्रीडा करावी तिच्यावर मजेत होडी चालवावी राजकीय क्षेत्रामध्ये जे स्थान गोखल्यांना गांधीच्या हृदयात त्यांच्या हयातीत व्यापले आणि मृत्युनंतरही जे ते व्यापुन जे ते व्यापुन राहीले आहेत ते स्थान दुसरया कोणीही घेतलेले नाही.

म.गांधीजीचा विचार सर्वसामान्यांसाठी किती प्रभावी आहे ते म्हणतात गांधीवाद नावाची एखादी गोष्ट किंवा तत्व अस्तित्वातच नाही .आणि माझ्यामागे असा एखादा पंथ चालु व्हावा अशी माझी इच्छाही नाही.मी एखादे नवे तत्व किंवा नवा सिध्दांत शोधुन काढला आहे .असा माझा दावाही मला करावयाचा नाही .फक्त मी आपल्या दैनंदिन जीवनाला समस्यांचा माझ्या स्वत:च्या पद्धतीने चिरंतन सत्य लागु करण्याचा प्रयत्न करुन पाहिला. ही उदारविचारसरणी सध्याच्या युगात असणे दिव्यच म्हणायला लागेल नाही का ? ते म्हणतात मला महात्मा म्हणण्यात येते म्हणुन माझे वचन कोणीही प्रमाण मानून चालु नये .महात्मा कोण हे आपल्याला माहित नाही म्हणुन योग्य मार्ग हाच की महात्म्या चे वचन देखील बुद्धीच्या कसोटीवर घासुन घ्यावे आणि कसाला न उतरल्यास त्याचा त्याग करावा.

म.गांधीवर अभ्यास करण्यासाठी १३० हुन अधिक जास्त देशांनी विदयापीठ सुरु केली आहेत. २००० साली मिलेनिअम वर प्रभाव टाकणारया व्यक्तीची निवड सुरु झाली . लेखक ,नेते शास्त्रज्ञ,कलावंत सगळी नावं मागं पडली आणि दोन उरली . एक आईन स्टाईन आणि दुसरे गांधीजी .पण गांधी हत्या झाल्यावर आईनस्टाईन काय म्हणाला होता माहित आहे ? तो म्हणाला की, 'गांधीसारखी हाडामांसाची महान व्यक्ती कधी काळी जन्मली होती आणि या भुतलावर चालली होती हे पुढच्या पिढयांना खरं वाटणार नाही '.(आईनस्टाईन हा मानवी इतिहासातील सर्वात बुदधीमान माणसापैकी एक आहे .)

माणसाचा प्रभाव दाखवुन देण्यासाठी चांगली गोष्ट साध्य करण्यासाठी चांगलीच साधने वापरणे ,वाईट साधनांचा अवलंब न करणे अत्यंत आवश्यक आहे .हेच काहीअंशी गांधीजीनी केले पण या कलियुगातील पिढी हे खरंच मानायला तयार आहे का ?

लॉर्ड माऊंटबॅटन हे शेवटचे व्हाईसरॉय आणि ब्रिटीश राजघराण्यातील त्यांनी म्हटलं आहे 'इतिहासाच्या पानावर गांधीजींच नाव ख्रिस्त आणि बुद्ध यांच्या बरोबरीने लिहीलं जाईल .कारण गांधी म्हणत भ्याडपणा आणि हिंसा यांच्यात निवड करण्याचा प्रसंग आला तर हिंसा करावी असे मी म्हणेन मी मानत आलेली अहिंसा धर्म पराकाष्ठेची क्रियाशील शक्ती आहे त्यात भ्याडपणाला किंवा दुर्बलतेला बिलकुल वाव नाही. अहिंसा पेलत नसेल तर हिंसेचा आधार घ्या परंतु भीतीने घरात बसु नका .कारण भ्याडपणा हि मोठी हिंसाच आहे.भिणे म्हणजे आत्म्याची हिंसा होय.जे लोक आपसात भांडतात, जे गरिबाची पिळवणुक करुन लाखो रुपये कमावतात, जे स्त्रीयांकडे वाईट नजरेने पाहतात जे गुरांवर असहय ओझे लादतात तेच खरे हिंसक त्यांची क्रुत्ये म्हणजेच खरी हिंसा .

मार्टीन ल्युथर किंग या क्रुष्णवर्णीयांच्या नेत्याचं चरित्रवाचतांना त्यांना गांधीजीविषयी जागोजाग क्रुतज्ञता व्यक्त केल्याच दिसलं . पुस्तकाच्या फोटो विभागात त्यांच्या खोलीत त्यांच्यामागे गांधीचा फोटो लावलेला होता. अमेरिकनसारख्या पिस्तुलगच्च देशात , त्यातही क्रुष्णवर्णीय समाजात अहिंसक चळवळ रूजवण्याच काम करु शकला हे गांधीजीच्या विचारांचे यश.

कॅलिफोर्नियात असलेल्या मेक्सिकन मजूरांचा नेता सीझर शॅवेज असाच .अहिंसक चळवळी तर करायचाच पण प्रश्न तडीला लावण्यासाठी गांधीजीसारखी वीस वीस दिवसांची उपोषणे करायचा.त्याच्याही खोलीत गांधीचा फोटो. कोणतीही सामाजिक विचारसरणी व संस्था घेतली तरी मानव हाच तिचा केंद्रबिंदू असतो.आपण काय करतो आणि काय करु शकतो हे समजले की जगातले बरेचसे प्रश्न सुटतील. कारण ताकद ही शारिरीक क्षमतेतून निर्माण होत नसते तर ती दुर्दम्य इच्छाशक्तीतुन येत असते .

एकदा ब्रिटीश नौसेना प्रमुखाची मुलगी जागतिक किर्तीचे लेखक रोमा रोलाँ यांना भेटायला गेल्यावर तिने युध्दमय पार्श्वभुमीवर जगाचे काय होईल असे विचारले तेव्हा ते म्हणाले की येशु ख्रिस्त आता नसलेत तरी पण या काळात भारतातल्या गांधी नावाच्या माणसाचे विचार या जगाला तारुन जातील .आजच्या युगात मनुष्य सत्य सोडतो तो कोणत्या तरी भयामुळेच सोडतो. तलवारबहाद्दराला इतका जो खटाटोप करावा लागतो त्याचं कारण भय आहे. त्याच्यात पुर्ण निर्भयता आली तर त्याचक्षणी त्याच्या हातातुन तलवार खाली पडेल त्या आधाराची त्याला जरूर राहणार नाही ज्याला शत्रुत्व नाही त्याला तलवार कशाला ? पण जगाचा विचार केला तर अहिंसेपेक्षा हिंसाच जास्त होतांना दिसते म्हणुन भय इथले संपत नाही ख्रिस्त व गांधीजीच्यासारख्या यातना सहन करुन अहिंसेतुन लढा देवुन दुसरया बाजूचे म्हणणे ऐकण्याची आपली तयारी नसेल तर लोकशाही विकसित होणे कितपत शक्य आहे .

महान कलावंत बेन किंग्जले सांगतो ,'मी आत्महत्येची चिठठी लिहून शेवटी शेवटची चक्कर ग्रथांलयात टाकावी म्हणुन गेलो तर तिथे मला गांधीजीचे पुस्तक मिळाले त्याचा प्रभाव पुढे तो कलाकार कुठे पोहोचला हा दैदिप्यमान इतिहास आहे. प्रत्येक व्यक्तीचे स्वातंत्र्य हेच सार्वत्रिक विकासाचे मुळ आहे.वर्तमानात आपण काय करतो यावर आपले भविष्य अवलंबून असते.स्वत:ला वेदना झाल्यावर कोणीही रडतो परंतु दुसरयाला वेदना झाल्यावर ज्याचे मन आक्रोश करतो तो माणुस.

नेल्सन मंडेलांनी ११ वर्ष लढा देऊन स्वातंत्र्य मिळवले आणि राष्ट्राध्यक्ष झाल्यावर म्हणाले मला पाहिलं पाऊल गांधीजींच्या भुमीत ठेवायचे आहे आणि ते भारतात आले ओबामा अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष झाल्यावर त्यांनी आपल्या पहिल्याच भाषणात म्हटले आहे की जर गांधीविचार नसते तर मी आज इथे नसतो.माणसाला कर्तव्याचा मार्ग दाखवणारा विचार आचारधर्म म्हणजे सुधारणा होय आपले चिंतन व आपल्या भावना यावर प्रभुत्व संपादन करणे म्हणजे नीती होय.ती पाळल्यानेच आपली ओळख पटते.

यासोबतच बीटल्स जॉन लेनन, रिचर्ड अँटनबरो, दलाई लामा, स्टीव्ह जॉब्स, कैलाश सत्यार्थी, मलाला युसुफझाई, अभय बंग, प्रकाश आमटे, कुमार सप्तर्षी इ.अनेक व्यक्ती गांधीपासुन प्रेरणा घेऊन मोठी झाली आणि त्यांनी जगाचा इतिहास बदलला कारण सत्याची उपासना करणारे लोक आयुष्यात कोणतीही जोखीम पत्करायला तयार होतात ते कोणत्याही व कशाही परकेपणाा भीत नाही ते प्राणपणाने आपला अहिंसक लढा लढत असतात त्याचबरोबर ते कोणतीही सेवा करण्यास तत्पर असतात. जिथे उत्साह आहे पुर्ण माहिती आहे स्वत:वर आणि परस्परांवर विश्वास असेल तर कुठलीच उणीव नसते पण ते संपादन करुन आपल्या उददिषट्यांकडे वाटचाल केली तर याच विचारांनी आपणही एक दिवस प्रभावी व्यक्तीमत्व ठरु शकतो यात तिळमात्र शंका नसावी.

# तरुण भारतासह विश्वाचे प्रेरणास्रोत

भारत सरकारने सन १९८५ मध्ये १२ जानेवारी या दिवसाला राष्ट्रीय युवा दिन म्हणून साजरा करायचे ठरवले. या दिवसाला असे काय महत्व आहे? तर या दिवशी स्वामी विवेकानंद यांची पावन जयंती असते. उठा, जागे व्हा आणि तोपर्यंत थांबू नका जोपर्यंत तुम्हाला तुमचे ध्येय मिळत नाही हा संदेश स्वामी विवेकानंद यांनी तरुणांना दिला. श्रीकृष्णदास (बापू) निरंकारीजीं यांच्या लेखणीतून जाणा उद्बोधक माहिती... संपादक.

भारतावर व जगावर स्वामी विवेकानंदांचा प्रभाव दिसून येतो. डॉ.बाबासाहेब आंबेडकर नेहरूंचे पीए एम.ओ.मथाई यांना म्हणाले होते की, अलिकडच्या शतकात भारताने निर्माण केलेला सर्वात मोठा माणूस म्हणजे विवेकानंद आहेत, गांधी नव्हे. नेताजी सुभाषचंद्र बोस म्हणाले होते, जोपर्यंत बंगालचा संबंध आहे, आम्ही विवेकानंदांना आधुनिक राष्ट्रीय चळवळीचे आध्यात्मिक पिता म्हणू शकतो. स्वामी विवेकानंदांच्या कार्याचा प्रभाव तत्कालीन समाजावर व त्यांच्या अनुयायांवर दोन वेगवेगळ्या प्रकारे पडला. काही विषय, व्यक्ती आणि प्रसंग यांवर त्यांनी कडाडून तोफ डागली. तर काही बाबतीत वाऱ्याच्या मंद झुळकीने फुलाची पाकळी जशी हळुवारपणे उमलते तसा त्यांचा प्रभाव होता. मानवी जीवनावर स्वामीजींच्या एकूण झालेल्या प्रभावाची अशी वर्गवारी करता येईल- त्यांनी वेदान्ताकडे पाहण्याची नवी दृष्टी दिली. निस्वार्थी मानवसेवा हाच खरा धर्म होय, असे त्यांनी आग्रहपूर्वक प्रतिपादन केले. भारतातील राष्ट्रीय, आध्यात्मिक चळवळी व इतर सामाजिक सेवाकार्ये या सगळ्यांच्या मागे प्रत्यक्षाप्रत्यक्षरीत्या स्वामीजींची प्रेरणा होती व आहे. पाश्चिमात्य जगात त्यांनी भारताचे आध्यात्मिक व सांस्कृतिक क्षेत्रातील दूत म्हणून भूमिका बजावली.

स्वामी विवेकानंद हे मूळचे बंगालचे रहिवासी असलेले भारतीय हिंदू विचारवंत होते. तरुणपणी ते रामकृष्ण परमहंस यांचे शिष्य झाले आणि रामकृष्णांचा संदेश जनमानसांत पोहचवण्यास त्यांनी रामकृष्ण मिशन सुरू केले. जगामध्ये रामकृष्ण मिशनच्या अनेक शाखा आहेत. भारत सरकारतर्फे विवेकानंदांचा जन्मदिवस हा युवक दिन म्हणून साजरा केला जातो. उत्तर कोलकत्ता सिमलापल्ली येथे दि. १२ जानेवारी १८६३ रोजी म्हणजेच पौष कृष्ण सप्तमी, संक्रांतीच्या दिवशी विवेकानंदांचा जन्म झाला. त्यांचे नाव नरेंद्र ठेवण्यात आले. वडील विश्वनाथ दत्त हे कोलकाता उच्च न्यायालयात वकीलाचे ॲटर्नी होते. ते सामाजिक आणि धार्मिक बाबीत पुरोगामी विचाराचे आणि दयाळू स्वभावाचे होते. आई भुवनेश्वरी देवी या धार्मिक वृत्तीच्या होत्या. नरेंद्रनाथांच्या विचारसरणीला आकार देण्यात त्यांच्या पालकांचा अनमोल वाटा होता. नरेंद्रनाथांना दर्शनशास्त्रे, इतिहास, समाजशास्त्रे, कला, साहित्य इत्यादी अनेक विषयांत रुची आणि गती होती. वेद, उपनिषदे, रामायण, महाभारत, भगवतगीता आदि धार्मिक साहित्यात त्यांनी विशेष आवड दाखवली. त्यांना शास्त्रीय संगीताची देखील जाण होती. त्यांनी बेनी गुप्ता व अहमद खान या उस्तादांकडून गायन-वादनाचे रीतसर शिक्षणही घेतले. किशोरावस्थेपासूनच ते व्यायाम, खेळ आदी उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग घेत. जुनाट अंधश्रद्धा आणि जात्याधारित भेदभाव त्यांच्या वैधतेसंबंधी त्यांनी लहान वयातच प्रश्न उपस्थित केले होते. सारासार विचार व व्यवहारी दृष्टिकोन यांचा आधार नसलेली कुठलीही गोष्ट स्वीकारण्यास त्यांनी नकार दिला होता. विवेकानंद हे मित्र परिवारात प्रिय होते. त्यांचे मित्र त्यांना बिले या नावाने तर त्यांचे गुरू नोरेन या शब्दाने हाक मारत. त्यांना वाचन, व्यायाम, कुस्ती, मुष्टियुद्ध, पोहणे, होडी वल्हवणे, घोडेस्वारी, लाठियुद्ध, गायन आणि वादन इत्यादी छंद होते. गुरूदेव रामकृष्णांनी नरेंद्रनाथांना संन्यासदीक्षा देऊन त्यांचे नामकरण स्वामी विवेकानंद असे केले. राजा अजितसिंग खेत्री यांनीही दि.१० मे १८९३ रोजी त्यांना विवेकानंद हेच नाव दिले.

स्वामी विवेकानंद म्हणजे योद्धा, संन्यासी, आणि तरुण पिढीचे अखंड प्रेरणास्रोत, ज्यांनी फक्त भारतातीलच नाही तर संपूर्ण जगातल्या युवा पिढीसमोर आदर्श ठेवला. सगळे देश भारताकडे मोठ्या आशेने बघत आहेत. का? तर भारत एक संधीचा देश आहे. या देशात अनेक संधी आज वाट बघत आहेत. जग भारताकडे आशेने बघत आहे. कारण आज आपला देश सर्वात तरुण देश आहे. ज्या देशाची ६५ टक्के लोकसंख्या तरुण असेल, ३५ वर्षांच्या आतली असेल, तो देश किती भाग्यवान आहे! आमच्याकडे आज कोटी कोटी युवा जनता आहे. जिथे ही तरुणाई असते, तिथे संकल्पांना काही सीमा नसतात, बंधने नसतात. कधी कधी आपल्या देशात युवकांच्या वेगवेगळ्या व्याख्या ऐकायला मिळतात. शास्त्रापासून आजपर्यंत तरुणाईच्या अनेक व्याख्या झाल्या आहेत. प्रत्येकाचा आपापला दृष्टीकोन असतो. अनेकांना वय हेच तारुण्याची ओळख आहे, असे वाटते. युवापिढी म्हणजे नव्या विचारांची आणि आधुनिकतेची सांगड घालून आपले म्हणणे समाजापुढे मांडणारी नव्या जोशाची पिढी आहे. खरे पाहता आपल्याला विविध प्रकारच्या क्षेत्रात चांगले यश पादाक्रांत करण्याची सुवर्ण संधी आणि पुरेसा वेळ आहे. भारताच्या एकूण लोकसंख्येपैकी तरुणांची संख्या अधिक आहे. तरूण म्हणजे प्रचंड उत्साह, काहीतरी करून दाखवण्याची धडपड होय. तरुण म्हणजे प्रचंड जोश, तरुण म्हणजे अफाट इच्छाशक्ती अशी कितीतरी विशेषण तरुणांना लागू पडतात. जगात तरुणांची संख्या अधिक आहे, त्यामुळे विविध तंत्रज्ञानात तरुणांची भरारी विलक्षणीय आहे. कधी तरुणाईचे पाऊल भलत्याच दिशेने पडताना दिसत आहे. त्याचे कारण म्हणजे व्यसनाधीनता, चंगळवाद, सोशल मिडीयाचा अतिरेक आदी आहेत. ही तरुणपिढीला लागलेली वाळवी आहे. कुठल्याही देशाची प्रगती ही तिथल्या तरुणांवर अवलंबून असते त्यामुळे आपल्या देशाला भक्कम आधार आपण तरुणच देऊ शकतो, हे प्रत्येकाने ध्यानात घेणे गरजेचे आहे. विशेषतः भारताचे सरासरी वय हे २८ आहे. त्यामुळे भारत जगातील सर्वात तरुण देश ठरतो. युवा वर्गाने स्व:ताला टेक्नॉलॉजीशी इतके सुसंगत ठेवले आहे, की ते जगाशी ओळख ठेवून आहेत. कुठे काय घडतेय हे त्यांना माहीत असते. पण याच टेक्नॉलॉजीशी ते इतके भावनिक गुंतले गेले आहेत, की त्यामुळे तिथूनच त्यांना नैराश्यही येते.

स्वामी विवेकानंदजींनी दि. ४ जुलै १९०२ रोजी कोलकात्याजवळील बेलूर मठात समाधी घेतली. समाधीच्या दिवशी त्यांनी पहाटे बेलूर मठात परिव्राजकांना शुक्ल यजुर्वेदाचा पाठ शिकवला. स्वामी प्रेमानंद या गुरुबंधूंसमवेत काही काळ फिरून त्यांना रामकृष्ण मठाच्या भविष्यासंबंधात काही सूचना केल्या. ध्यान करत असतांना रात्री त्यांनी समाधी घेतली. चाळीस वर्षापर्यंत आपण जगणार नाही, ही स्वतःची भविष्यवाणी खरी केली. खरच आपणच आपले भविष्य घडवायला हवे. कोणावरही अवलंबून राहणे, हे योग्य नाहीच!

!!स्वामी विवेकानंदजींना जयंतीनिमित्त विनम्र अभिवादन व चिरतरुण भारताला राष्ट्रीय युवा दिवसाच्या प्रेरणादायी हार्दिक शुभेच्छा जी !!

**श्रीकृष्णदास (बापू) निरंकारी.**
(वैभवशाली भारतातील थोर पुरुषांच्या इतिहासाचे गाढे अभ्यासक व विश्लेषक.)
द्वारा- प. पू. गुरूदेव हरदेव कृपानिवास.
मु. रामनगर वॉर्ड नं. २०, गडचिरोली.
पो. ता. जि. गडचिरोली (पिन- ४४२६०५).
फक्त व्हा. नं. ७४१४९८३३३९.
इमेल
krishnadas.nirankari@gmail.com

# शालेय जीवनातच मिळावे वाहतूक नियमांचे धडे




**नागपूर :** वाहतुकीचे नियम तोडणाऱ्यांना दंड ठोठावला. कायदे कडक केले; तरीही रस्ते अपघातातील मृत्यू थांबलेले नाहीत. मानसिकता बदलत नाही, तोपर्यंत आपण यावर नियंत्रण मिळवू शकत नाही. शालेय जीवनातच वाहतुकीच्या नियमांचे धडे मिळणे आवश्यक आहे. शालेय शिक्षण घेण्याच्या वयात मुलांवर चांगल्या गोष्टींचा प्रभाव पडला तर तो कायमस्वरुपी राहतो, असे प्रतिपादन केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री ना. नितीन गडकरी यांनी येथे व्यक्त केले.

सडक सुरक्षा अभियानांतर्गत वनामती येथे आयोजित कार्यक्रमात सुप्रसिद्ध अभिनेते अनुपम खेर यांनी ना. गडकरी यांची प्रकट मुलाखत घेतली. सुरुवातीलाच अनुपम खेर यांनी ना. गडकरी यांनी देशभर महामार्गांचे जाळे विणण्याचे मोठे काम केल्याचा उल्लेख केला. अपघातांमध्ये मृत्यू होणे ही अत्यंत दुर्दैवी बाब आहे, असे ना. गडकरी म्हणाले. कोरोनामध्ये, युद्धामध्ये किंवा एखाद्या दंग्यामध्ये जेवढ्या लोकांचा मृत्यू झाला नसेल तेवढे मृत्यू दरवर्षी रस्ते अपघातामध्ये होतात. याची मला खंत वाटते. रस्ते अपघात रोखायचे असतील तर अचूक निर्माणकार्य आणि समाजजागृती दोन्हींची आवश्यकता आहे. जनजागृतीचे कार्य शालेय स्तरापासूनच व्हायला हवे.

या देशात आणखी उत्तम रस्ते तयार होतील. पण लोकांना शिस्त नसेल तर या रस्त्यांचा काहीही उपयोग नाही. सिग्नल तोडणे, लेन तोडून निघून जाणे, मर्यादेपेक्षा जास्त वेगाने गाडी चालणे, हेल्मेट न लावणे, सिटबेल्ट न बांधणे अशा कितीतरी चुका लोक करतात. आपली आईल, पत्नी, मुले घरी वाट बघत असतील, हे ध्यानात ठेवून गाडी चालवावी. कारण वर्षभरात होणाऱ्या अपघतांमध्ये जे मृत्यू होतात, त्यात १८ ते ३४ वर्ष वयोगटातील तरुणांची संख्या जास्त आहे. एखाद्या घरातील तरुण अचानक निघून जातो, तेव्हा त्या कुटुंबावर कोसळणाऱ्या संकटाची आपण कल्पनाही करू शकत नाही, अशा भावनाही ना. गडकरी यांनी व्यक्त केल्या.

## चैताली वरघट साई गुणगौरव समाजभूषण पुरस्काराने सन्मानीत

**अकोला :** ओम साई विकास प्रतिष्ठान व बीबीसी फिल्म प्रोडक्शन महाराष्ट्र राज्य, राष्ट्रीय पातळीवरील पुरस्कार, साईच्या पवित्र भूमीत शिर्डी येथे संपन्न झाला. विदर्भ जिल्हा अकोला, तालुका मूर्तिजापूर येथील कवयित्री लेखिका सौ चैताली संगोपाल वरघट यांना साई गुणगौरव समाजभूषण पुरस्कार २०२५ मान्यवरांच्या हस्ते देऊन सन्मानीत करण्यात आले आहे. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष स्थान श्री सुदाम संसारे, सल्लागार श्री डॉ.अजय वारुळे, उपाध्यक्षा सौ वंदना मिलिंद गव्हाणे, अभिनेत्री चित्रा दिक्षित उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते सौ चैताली संगोपाल वरघट साई गुणगौरव समाजभूषण पुरस्कार २०२५ ने सन्मानीत करण्यात आले आहे. पुरस्कार मिळाल्याने विविध स्तरातून कौतुक होत आहे. दिनांक १० जानेवारी, वार शुक्रवार रोजी साईच्या पावन भूमीत शिर्डीत साई गुणगौरव समाजभूषण पुरस्कार २०२५ हा भव्य व दिव्य पुरस्कार सोहळा अतिशय शांततेत व खेळीमेळीच्या वातावरणात संपन्न झाला. या पुरस्कार सोहळ्यास महाराष्ट्र राज्यातील व गुजरात राज्यातील मान्यवर हा मानाचा, सन्मानाचा व प्रतिष्ठेचा पुरस्कार घेण्यासाठी सुमारे पाचशे हुन अधिक लोकांनी येऊन हजेरी लावली. कला, क्रीडा, शैक्षणिक, सामाजिक, पत्रकारिता, सिने अभिनय इत्यादी क्षेत्रामध्ये उत्कृष्ट कार्य करीत असणाऱ्यांना पुरस्कार सोहळ्यात अनमोल कार्यासाठी सन्मानित करण्यात आले. अतिशय शिस्तबद्धपणे हा भव्य व दिव्य पुरस्कार सोहळा खरोखरच डोळ्याचे पारणे फेडणारा नेत्रदीपक असा झाला.

# महात्मा फुले जन आरोग्य योजनेचा लाभ जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोहोचवा

**मुंबई :** सार्वजनिक आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांनी महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेचा आढावा घेताना योजना लाभार्थ्यांपर्यंत प्रभावीपणे पोहोचवण्याच्या सूचना दिल्या. त्यांनी रस्ते अपघातांमध्ये जखमींना तातडीने उपचार मिळण्यासाठी नजीकच्या रुग्णालयात योजनेचा लाभ देणारे धोरण तयार करण्याचे निर्देश दिले.

योजनेच्या पोर्टलवर प्रलंबित असलेल्या १,०७५ तक्रारींवर तातडीने कार्यवाही करावी, तसेच नोटीस पाठवून खुलासा घ्यावा, असे मंत्री आबिटकर यांनी सांगितले. तक्रारींची निपटारा प्रक्रिया दोन आठवड्यांत पूर्ण करावी आणि अंमलबजावणी सहाय्य संस्थांकडून कार्यवाही होत नसल्यास, संबंधित संस्थांवर कारवाईचे निर्देश दिले.

तक्रार निवारणासाठी नवीन प्रमाणित कार्यपद्धती विकसित करून कठोर कारवाईच्या तरतुदी करण्यात याव्यात, असेही त्यांनी स्पष्ट केले. तक्रारींवर वेळेत कार्यवाही न करणाऱ्या संस्थांवर कठोर पावले उचलण्याचा इशाराही मंत्री आबिटकर यांनी दिला.

ही योजना सर्वसामान्यांना अधिक सुलभ आणि परिणामकारक करण्यासाठी, तसेच अपघातग्रस्त आणि गरजू रुग्णांना तत्काळ मदत पोहोचवण्यासाठी सुधारणा करण्याचा सरकारचा प्रयत्न असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले. आयुष्मान कार्डच्या १०० टक्के वितरणाकरिता तांत्रिक अडचणी दूर करण्यासाठी राष्ट्रीय आरोग्य प्राधिकरण, राष्ट्रीय सूचना व विज्ञान केंद्र, अन्न व नागरी पुरवठा विभागाची आरोग्य विभागासोबत संयुक्त बैठक आयोजित करण्यात यावी. सध्या योजनेनुसार १ हजार ३५६ उपचार पद्धती आहे. या पद्धतींचा आढावा घेऊन त्यामध्ये राष्ट्रीय आरोग्य प्राधिकरणाच्या उपचार पद्धतीपैकी आवश्यक उपचारांचा समावेश करणे, सध्याच्या उपचार पद्धतीत बदल किंवा सुधारणा करणे, नवीन उपचार पद्धतींचा समावेश, शासकीय रूग्णालयांच्या राखीव प्रक्रियांपैकी काही उपचार आवश्यकतेप्रमाणे खाजगी रूग्णालयासाठी उपलब्ध करून देण्याबाबत तज्ज्ञांशी चर्चा करून प्रस्ताव तयार करण्यात यावे, असे निर्देशही यावेळी आरोग्य मंत्री यांनी दिले.

# उद्धव ठाकरेंनी महाविकास आघाडी का सोडली? प्रकाश आंबेडकरांचे खळबळजनक विधान

**मुंबई :** वंचित बहुजन आघाडीचे प्रमुख प्रकाश आंबेडकर यांनी उद्धव ठाकरे यांच्या महाविकास आघाडीतून बाहेर पडण्यामागचे कारण स्पष्ट करत खळबळजनक विधान केले आहे. त्यांनी उद्धव ठाकरे आणि आदित्य ठाकरे यांच्या नेतृत्वावर भाष्य करत या निर्णयामागचे राजकारण उघड केले आहे.

प्रकाश आंबेडकर म्हणाले, उद्धव ठाकरे यांनी महाविकास आघाडीतून बाहेर पडण्यामागे मोठे कारण म्हणजे त्यांच्यावरचा दबाव. त्यांनी स्वतःहून हा निर्णय घेतलेला नाही, तर काही नेत्यांच्या दबावामुळे ते महाविकास आघाडीत राहू शकले नाहीत. या दबावामागे आदित्य ठाकरेंची भूमिका मोठी असल्याचे दिसते. आदित्य यांना स्वबळावर राजकारण करण्याची इच्छा होती, ज्यामुळे उद्धव ठाकरेंना आघाडीतून बाहेर पडावे लागले.

**स्वबळावर लढण्याचा मुद्दा महत्त्वाचा**

प्रकाश आंबेडकर यांनी उद्धव ठाकरे गटाने महापालिका निवडणुकांमध्ये स्वबळाचा नारा दिल्याबाबतही भाष्य केले. महाविकास आघाडीच्या अस्तित्वावर प्रश्नचिन्ह निर्माण करण्यासाठी ठाकरे गटाने हा निर्णय घेतला आहे. हे सर्व काही पूर्वनियोजित असून, आदित्य ठाकरे यांनी स्वबळावर लढण्याचा आग्रह धरल्यामुळे उद्धव ठाकरेंना हा कठोर निर्णय घ्यावा लागला, असे आंबेडकर म्हणाले.

**महाविकास आघाडीत तणाव ?**

महाविकास आघाडीतील घटक पक्षांनी आधीच एकत्रित राहून निवडणुका लढण्याची भूमिका घेतली होती. मात्र, ठाकरे गटाच्या या निर्णयामुळे काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेससाठी नवा पेच निर्माण झाला आहे. महाविकास आघाडीत राहून सर्वांनी एकत्रित ताकद दाखवावी, अशी काँग्रेस आणि राष्ट्रवादीची भूमिका आहे.

**लोकसभा-विधानसभेसाठी स्वबळाची गरज: अरविंद सावंत**

ठाकरे गटाचे खासदार अरविंद सावंत यांनी लोकसभा आणि विधानसभा निवडणुकांसाठी स्वबळाची गरज असल्याचे मत व्यक्त केले आहे. दक्षिण मुंबईचे खासदार असलेल्या सावंत यांनी सांगितले की, महापालिका, जिल्हा परिषद आणि नगरपंचायतींसारख्या स्थानिक निवडणुकांमध्ये कार्यकर्त्यांना संधी देणे आवश्यक आहे. कार्यकर्त्यांना संधी देताना जर अडचणी येत असतील, तर पक्षाने स्वावलंबी होऊन स्वबळावर लढले पाहिजे, असे त्यांनी स्पष्ट केले.

संजय राऊत यांनी दिलेल्या स्वबळाच्या नाऱ्याला पाठिंबा दर्शवत सावंत म्हणाले की, राऊत यांची भूमिका निश्चितच स्वागतार्ह आहे. या वक्तव्यामुळे ठाकरे गटाचा स्वबळावर लढण्याचा निर्धार अधोरेखित झाला आहे.

## ग्रामायण प्रदर्शनासाठी पार पडला भूमिपूजन सोहळा

**नागपूर :** ग्रामायण प्रतिष्ठानच्या उद्यम प्रदर्शनाचा भूमिपूजन सोहळा शनिवार, ११ जानेवारी रोजी आंध्र असोसिएशन, अमृत भवन, सीताबर्डी येथे संपन्न झाला. १६ ते २० जानेवारी या कालावधीत हे प्रदर्शन आयोजित करण्यात आले आहे. या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून सुप्रसिद्ध उद्योगपती भगवानजी नारदेलवार उपस्थित होते. भूमिपूजनासाठी सौ. जयश्री व श्री. जयंत अलकरी आणि श्री. व सौ. कविता राजवाडकर हे दोन दांपत्य विराजमान होते. सौ. रेवती सहदेव यांनी पौरोहित्य केले. नारदेलवार यांनी कुदळ मारून भूमिपूजन सोहळा संपन्न केला. कार्यक्रमाची प्रस्तावना व अध्यक्षांचा परिचय डॉ. चंद्रकांत रागीट यांनी केला. यानंतर अध्यक्ष श्री. नारदेलवार यांनी आपला प्रेरणादायी प्रवास कथन केला. त्यांनी किमान पगारावर नोकरी सुरू करत पाच जिल्ह्यांमध्ये ट्रान्सफॉर्मर कंपन्या उभारण्यापर्यंतचा यशस्वी प्रवास उलगडून सांगितला. संजय सराफ यांनी प्रदर्शनात होणाऱ्या विविध कार्यक्रमांचे स्वरूप उलगडून सांगितले व आभार मानले. प्रदर्शनाची उभारणी करणारे वाघमारे यावेळी उपस्थित होते. कार्यक्रमानंतर चहापान व कार्यकर्त्यांची बैठक झाली.

# आपल्या फिटनेसच्या समर्पणासाठी किशोरी शहाणे घालत आहे स्वत:चे आदर्श उदाहरण!




**मुंबई, १२ जानेवारी :** नावाजलेल्या अभिनेत्री किशोरी शहाणे यांनी नेहमीच आपल्या उत्तम अभिनयाने प्रेक्षकांचे लक्ष वेधले असून आता आपल्या फिटनेसप्रतिच्या समर्पणाने त्या एक आदर्श उदाहरण घालून देत आहेत. सध्या झी टीव्हीवरील लोकप्रिय मालिका कैसे मुझे तुम मिल गयेमध्ये बबिता आहुजाच्या रूपात दिसून येणाऱ्या किशोरी यांनी हे सिद्ध केले आहे की निरोगी आणि सक्रिय जीवनशैली राखण्यामध्ये वयाची अट असू शकत नाही. ह्या मालिकेच्या सेटवर किशोरी शहाणे ह्या अनेकदा आपल्या सहकलाकारांना हलकेफुलके स्ट्रेचेस आणि व्यायाम करण्यासाठी प्रोत्साहन देताना दिसून येतात. हल्लीच त्या जिममध्ये दिसून आल्या आणि आपल्या फिटनेसप्रति त्यांचे समर्पण त्यांचे चाहते आणि सहकारी सर्वांसाठीच प्रेरणादायी आहे. आपल्या आरोग्य आणि स्वास्थ्यासाठी त्यांचे अढळ समर्पण हे त्यांच्या उजळलेला चेहरा, उत्तम ऊर्जा आणि व्यस्त चित्रीकरणाच्या शेड्युलला सहजपणे सामोरे जाण्याची क्षमता यांमधून प्रतिबिंबित होते.

किशोरी शहाणे म्हणाल्या, माझ्यासाठी फिटनेस म्हणजे केवळ एखादा लूक किंवा बाहेरून चांगले दिसण्यासाठी नसून ते एकूणच आपल्याला आतून चांगले वाटावे आणि आपल्या स्वास्थ्याचे संवर्धन व्हावे यासाठी आहे. अशाप्रकारे सेटवरील दीर्घकाळ कामातून मी स्वतःला रीचार्ज करते आणि संतुलन साधते. ला वाटतं नियमितपणे व्यायाम केल्याने केवळ आपले शरीरच मजबूत होत नाही तर आपल्या मनामध्येही एक प्रकारचा स्पष्टपणा आणि शांतता येते. दिवसभराच्या चित्रीकरणाच्या व्यस्त शेड्युलमध्येही मी माझ्या दैनंदिन रूटिनमध्ये हलकेफुलके स्ट्रेचेस आणि श्वासाचे व्यायाम यांची भर घालते आणि त्यामुळे मला दिवसभर तरतरीत राहण्यासाठी आणि लक्ष केंद्रित करायला मदत होते. हे छोटे पण निरंतर प्रयासच मोठा फरक घडवून आणतात. निरोगी शरीर हे निरोगी आणि आनंदी मनासाठी गरजेचे असून आपल्या दैनंदिन जीवनताा आपण फिटनेस आणि सेल्फ-केअर या गोष्टींकडे लक्ष द्यायलाच हवे. व्यायाम असो किंवा ध्यान करणे असो प्रत्येकाने आपल्या शरीरासोबत जोडण्यासाठी आपला मार्ग शोधून काढायला हवा आणि आपले मानसिक आणि भावनिक आरोग्य सुधारायला हवे.

किशोरी ह्या आपल्या व्यायामासाठी आणि संतुलित आहारासाठी वेळ देत असताना, प्रेक्षकांसाठी हे पाहणे रोचक ठरेल की अमृता (सृती झा) आणि विराट (अर्जित तनेजा) हे प्रियांका (प्रतिक्षा होन्मुखे) ला धडा शिकवण्यासाठी काय नवीन योजना आखतील.

# शब्दकोडे क्रमांक २०१४



**आडवे शब्द :-**
१) सतत, खंड न पडता
४) चाकर
६) बाण
८) सावकार
१०) त्वरित, लवकर
११) घागरा
१४) तरुण(हिं.)
१६) न स्वीकारणे
१७) मदत करणारा
१९) बंधन
२०) वेगळा
२१) अनेक प्रकार
२३) होडी चालविणारा
२६) सेवक
२७) गळ्याच्या मागचा अवयव, प्रतिष्ठा
२८) नूतन
२९) राजबिंडा, सुकुमार
३१) माया, ममत्व
३४) सिंह
३५) लोखंडाला चढलेला गंज
३६) अंधारात शोधणे,
३८) ** सदाशिव, भोळा
३९) हिंदीत सर्व
४०) मिठाई तयार करणारा
४२) रक्तवाहिनी
४४) डावरा
४६) स्वर्गंगा एका हिंदी नटीचे नाव
४८) शेकडा प्रमाण
४९) साय
५०) चंद्र
५२) नवेच्या विरुद्ध
५३) वर्ष, साल
५४) घोडा
५५) श्रेष्ठ पुरुष
५७) कडक
५९) अजगर, एक इंग्रजी आद्याक्षर
६१) मातीचा कण
६२) धनुष्याच्या ताणलेल्या दोरीचा आवाज
६३) दुर्दशा
६५) पाणी
६६) साडेसातीचा ग्रह
६७) जाणकार
६९) केस
७०) छोटा
७१) मयूर
७२) निमग्न
७३) फणीने केस मोकळे करण्याची क्रिया
७४) पाणी उकळताना होणारा आवाज

**उभे शब्द :-**
१) वकिलाचे कूळ
२) वाघोबा
३) तप करणारा
४) नोकराशी केलेला करार
५) हात
७) रात्र
८) द्रव्य, पैसा
९) आवळा देऊन घेण्याचे फळ
१२) कप्पा, खण
१३) मोठी नदी
१५) वाईट इच्छा
१६) जेऊ घालणारा
१७) पुष्परस
१८) तरतूद
१९) ध्वनी
२२) विनंती करणे
२४) वाईट, नासलेले
२५) यज्ञ
२८) अत्यंत नीच
३०) पाहुणचार
३२) मोठे घर, राजवाडा
३३) नृत्य
३५) लाल
३६) डोक्यावरचे केस ज्याने झडतात तो रोग
३७) पटल
३९) खोलवर, खोल
४०) उपस्थित
४१) वाचण्यास योग्य असे साहित्य
४२) मालक
४३) व्यवस्थित, यथायोग्य
४५) उलटी, वांती
४६) घुसळणे, चर्चा
४७) खेळण्याच्या पत्त्यातील एक काळे पान
५१ विष
५३) रसरसकट
५६) रात्री फिरणारा, (चोर, घुबड इ.)
५८) टोळीचा प्रमुख
५९) नाविक दल
६०) गाईची एक जंगली जात
६३) प्रतिष्ठा अब्रू
६४) नवरदेव
६६) काया, देह
६८) कल्याण
६९) ** देवयानी
७१) बैलाच्या सहाय्याने विहिरीतून पाणी काढण्याचे साधन

(उत्तर उद्याच्या अंकात)

**मागील शब्दकोड्याचे उत्तर**



# कॅलिडोस्कोप



## हरखले मन

*डोंगरांच्या माथ्यावरी
आले विसावया मेघ
तरुतळी झाली तळी
त्यात अमृताचा ओघ
दूर क्षितिजी सजली
इंद्रधनूची कमान
सात रंगांचा सोहळा
पाहे हरखून मन*

## पुरुषाला प्रसूती रजा?

**ए**खादा पुरुष गरोदर असल्याचे ऐकले आहे का? बिहारच्या शिक्षण विभागाने एका पुरुष शिक्षकाला गर्भवती केले. वास्तविक शिक्षक गर्भवती नव्हता, तर शिक्षण विभागाच्या दुर्लक्षामुळे त्याला प्रसूती रजेवर पाठवण्यात आले. हे प्रकरण समोर आल्यानंतर बिहार शिक्षण विभाग आणि शिक्षकांची खिल्ली उडवली जात आहे.

हे विचित्र प्रकरण वैशाली जिल्ह्यातील हाजीपूरचे आहे. येथे महुआ ब्लॉक परिसरातील हसनपूर ओसती हायस्कूलमध्ये एक शिक्षक तैनात आहे. त्याचे नाव जितेंद्र कुमार सिंह आहे. त्याला गरोदर ठरवून शिक्षण विभागाने घरी सोडले. ही प्रसूती रजा शिक्षण विभागाच्या ई-शिक्षा कोश पोर्टलवर देण्यात आली होती. ही रजाही त्यांनी अधिकृत वेबसाइटवर अपलोड केली. शिक्षण विभाग आणि अधिकृत वेबसाइटच्या नजरेनुसार शिक्षक जितेंद्र गरोदर असून रजेवर आहेत.



शिक्षण विभागाने महिलांसाठी उपलब्ध असलेल्या शासकीय रजेचा फायदा पुरुष शिक्षकाला दिल्याने इतर शिक्षकांमध्ये संतापाचे वातावरण आहे. पुरुष शिक्षकाला प्रसूती रजा देण्याबाबत ब्लॉक शिक्षण अधिकारी अर्चना कुमारी म्हणाल्या, की तांत्रिक कारणामुळे ही अनियमितता झाली. पुरुष शिक्षकाला अशा प्रकारे रजा दिली जात नाही. या घटनेची माहिती विभागाला मिळताच त्यांनी या प्रकरणाचा तपास सुरू केला. या त्रुटीबद्दल शिक्षणाधिकाऱ्यांनी खंत व्यक्त करत ही चूक विभाग तातडीने दुरुस्त करेल, असे सांगितले.



## भन्नाट रेस्टॉरंट्स

**घ**रच्या जेवणाचा कंटाळा आला की आपण एखाद्या रेस्टॉरंटमध्ये जेवायला जातो. रेस्टॉरंटमध्ये जायचा प्लॅन एका क्षणात ठरतो. आवडतं रेस्टॉरंट धुंडाळलं जातं आणि मस्तपैकी जेवणाचा आस्वाद घेतला जातो. मात्र एखाद्या रेस्टॉरंटमध्ये जेवायला जाण्यासाठी चार महिने वाट बघावी लागत असेल तर किंवा एखाद्या रेस्टॉरंटमध्ये सर्वत्र बर्फच बर्फ असेल तर... जगभरात अशी काही भन्नाट रेस्टॉरंट्स आहेत. अशाच काही रेस्टॉरंट्सची सैर करू या. चीनमधल्या शांघाय शहरामध्ये 'अल्ट्राव्हायोलेट' नावाची एक इमारत आहे. मात्र ती नेमकी कुठे आहे हे कोणालाच माहीत नाही. इथल्या एका रेस्टॉरंटमध्ये दर संध्याकाळी खास स्वयंपाक केला जातो. अनेकविध पदार्थांची मेजवानी असते. इथे जाण्याआधी नोंदणी करावी लागते. साधारण चार महिने आधी बुकिंग केल्यानंतर या ठिकाणी जेवणाची संधी मिळते. रेस्टॉरंटमध्ये येणाऱ्या लोकांना विशिष्ट ठिकाणी बोलावलं जातं. मग तिथून त्यांना गुप्त पद्धतीने रेस्टॉरंटमध्ये नेतात. रेस्टॉरंटचा डायनिंग हॉल साधाच आहे. पण इथल्या जेवणाची चव जिभेवर रेंगाळते. दुबईमध्ये 'चिलआउट आईस लाउंज' आहे. या रेस्टॉरंटमध्ये चहूबाजूला फक्त बर्फच दिसतो. इथलं फर्निचरही बर्फाचंच आहे. अंतर्गत सजावटीसाठी बर्फाचाच वापर करण्यात आला आहे. खुर्चीवर ॲक्रेलिक पॅड्स बसवण्यात आली आहेत. थंडी वाजली तर ग्राहकांना जॅकेट्स उपलब्ध करून दिली जातात. या रेस्टॉरंटमध्ये छान गारेगार वाटतं. इथे जेवण्याची मजा वेगळीच असणार यात शंका नाही.





## भेट तुझी माझी

**जो**ड्या स्वर्गात बनलेल्या असतात. या पृथ्वीवर माणसं फक्त एकमेकांना भेटतात, असं म्हटलं जातं. या जगात कोण, कोणाला कधी भेटेल याचा काहीच नेम नसतो. कॉलेजच्या वयात प्रेम जडतं. पण काही कारणांनी लग्न होऊ शकत नाही. नवा संसार थाटला तरी प्रियकर आणि प्रेयसी एकमेकांसाठी झुरत रहातात आणि अशातच अचानक अनेक वर्षांनी प्रियकर आणि प्रेयसी एकमेकांना भेटले तर... अशीच एक घटना फ्रान्समध्ये घडली. इथे एक प्रेमी जोडपं तब्बल ७५ वर्षांनी एकमेकांना भेटलं. यातल्या प्रियकराचं वय होतं ९७ वर्षं तर प्रेयसीही ९२ वर्षांची झाली होती. दुसऱ्या महायुद्धाच्या काळात म्हणजे १९४४ मध्ये २४ वर्षांचा केटी रॉबिन्स १८ वर्षांच्या जेनिन पियरसनला भेटला. पाहताक्षणीच ते एकमेकांच्या प्रेमात पडले. रॉबिन्स अमेरिकेचा तर जेनिन फ्रान्सची होती. रॉबिन्स अमेरिकन सैन्यात होता. त्यामुळे तो रणभूमीवर निघून गेला. त्यावेळी जेनिन खूप रडली. तिने त्याची वाटही बघितली. पण रॉबिन्स काही आला नाही. मात्र एकमेकांच्या आठवणी त्यांच्या मनातून कधीही गेल्या नाहीत. ९७ वर्षांचे रॉबिन्स एका कार्यक्रमाच्या निमित्ताने फ्रान्सला गेले होते. त्यावेळी ते जेनिनला भेटले. या क्षणी दोघंही खूप भावूक झाले होते. रॉबिन्स अमेरिकेला परत निघून गेले. पण जाताना त्यांनी जेनिनला परत भेटण्याचं वचनही दिलं.

## नववधूच्या घरावर लाखो रुपयांचा पाऊस!

**ल**ग्न म्हणजे दोन जीवांचं मिलन... लग्न केवळ दोघांचेच होत नाही, तर त्यासोबत दोन कुटुंबही एकत्र येतात. आजकालच्या बदलत्या काळानुसार लग्न म्हणजे एक एव्हेंट झाले आहे. प्रत्येकाला लग्नात मोठ्यातला मोठा खर्च करून दाखवायचे असते, तर काही लोक लग्न अगदी साध्या पद्धतीने करतात. लग्नात प्रत्येकाला काहीतरी खास करायचे असते. अनेक वेळा वराच्या किंवा वधूच्या विचित्र मागण्या ऐकून लोक आश्चर्यचकित होतात. सोशल मीडियावर एक व्हिडीओ व्हायरल झाला. त्यात एक हेलिकॉप्टरमधून लाखो रुपयांच्या नोटांची उधळण करत असल्याचे दिसत आहे. वधूच्या वडिलांच्या मागणीवरून वराच्या वडिलांनी हेलिकॉप्टर भाड्याने घेतले होते. ते पाहण्यासाठी मोठ्या संख्येने लोक जमले होते. वराच्या वडिलांनी मुलाच्या लग्नासाठी विमान भाड्याने घेतले आणि वधूच्या घरी लाखो रुपयांची उधळण केली. आता नवरा मुलगा वडिलांचे ऋण आयुष्यभर फेडत राहणार असे दिसते. हा व्हिडीओ पाहिल्यानंतर अनेकांना आश्चर्याचा धक्का बसला.



एका सोशल मीडिया यूजरने लिहिले, की ही केवळ पैशाची उधळपट्टी आहे, दुसरे काही नाही. दुसऱ्याने लिहिले, की वधूच्या घरावर सत्ता दाखवण्यासाठी लोक कर्जही घेतात. एकाने लिहिले, की वधू-वरांना बाजूला ठेवा, आज त्यांचे शेजारी सर्वात जास्त आनंदी असतील, कारण त्यांच्या घरावर नोटांचा पाऊस पडला आहे.



## असंही स्वागत!

**आ**पण पावसाची अत्यंत आतुरतेने वाट बघत असतो. पाऊस पडावा म्हणून बरेच उपाय केले जातात. काही ठिकाणी बेडकांचं लग्न लावलं जातं. मान्सूनचं आगमन झाल्यानंतर भारतातल्या विविध प्रांतांमध्ये आनंद साजरा केला जातो. आनंद साजरा करण्याच्या अनेक पद्धती आहेत. कर्नाटकमध्ये पाऊस पडल्यानंतर लोक चिखलात नाचतात. 'केसर्ड ओंजी दिना' या नावाने हा उत्सव साजरा केला जातो. 'एक दिवस चिखलात नाचा' असा याचा अर्थ होतो. मंगळुरूमधल्या शेतांमध्ये या उत्सवाचं आयोजन केलं जातं. सर्वच स्तरातले नागरिक यात सहभागी होतात. ज्ञानशक्ती सुब्रमण्यम स्वामी मंदिरातर्फे या उत्सवाचं आयोजन केलं जातं. यावेळी नागरिक नृत्य करत लोकगीतं म्हणतात. यासोबतच चिखलातच विविध खेळ खेळले जातात. शेतांमध्ये पाणी साचलं की या उत्सवाचं आयोजन होतं. इथे खूपच धम्माल येते.

## वर्गात पाहत होते आक्षेपार्ह व्हिडीओ!

**उ**त्तर प्रदेशात एका शिक्षकाने आठ वर्षाच्या विद्यार्थ्याला बेदम मारहाण केली. झासी येथे ही घटना घडली आहे. शिक्षक वर्गामध्ये बसूनच पॉर्न व्हिडीओ पाहत होता. विद्यार्थ्याने शिक्षकाला वर्गात पॉर्न पाहताना पाहिल्यानंतर जोरात हसू लागला होता. यामुळे शिक्षक चिडला आणि विद्यार्थी जखमी होईपर्यंत त्याला जबर मारहाण केली. मुलाला मारहाण झाल्याचे समजल्यानंतर त्याच्या पालकांनी संताप व्यक्त केला आहे. त्यांनी याप्रकरणी पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. शिक्षक कुलदीप यादवला चौकशीसाठी ताब्यात घेतले आहे.



कुलदीप यादव हा शिक्षक वर्गात बसून आक्षेपार्ह पॉर्न व्हिडीओ पाहत होता. यामुळे एक विद्यार्थी आणि त्याचे वर्गमित्र जोरजोरात हसू लागले होते. यामुळे कुलदीप यादव इतका चिडला, की त्याने विद्यार्थ्याचे केस धरून उभे केलं. इतकेच नाही तर त्याने विद्यार्थ्याचे डोके भिंतीवर जोरात आदळले. मुलाच्या वडिलांनी दिलेल्या माहितीनुसार, विद्यार्थ्यांच्या प्रतिक्रियेमुळे यादवचा संताप झाला. त्याने माझ्या मुलाला शिवीगाळ केली आणि अत्यंत बेदम मारहाण केली. त्याने माझ्या मुलाला केसांनी पकडले आणि त्याचे डोके भिंतीवर आपटले. त्याने छडीनेही माझ्या मुलाला मारहाण केली. माझा मुलगा गंभीर जखमी झाला आहे. त्याच्या कानालाही जखम झाली आहे.

मुलाच्या वडिलांनी तक्रार दाखल केल्यानंतर पोलिसांनी शिक्षक कुलदीप यादवला चौकशीसाठी ताब्यात घेतले.



## विमानाचं मायलेज किती?

**वि**मानाची उड्डाणं सतत सुरू असतात. विमानप्रवासामुळे वेळेची बचत होत असली तरी इंधनाचा खूप वापर होतो. चारचाकी गाडी घेताना आपण तिचं मायलेज बघतो. गाडीत एक लीटर पेट्रोल किंवा डिझेल भरल्यानंतर ती किती किलोमीटर धावते यावर बरंच काही अवलंबून असतं. अशा परिस्थितीत एक लीटर इंधन भरल्यानंतर विमान किती अंतर कापू शकतं, हा विचार तुमच्या डोक्यात कधी आला आहे का? विमानाच्या मायलेजबाबत जाणून घेणं रंजक ठरेल.

उड्डाण केल्यानंतर विमान एका सेकंदात साधारण चार लीटर इंधन खर्च करतं. 'बोईंग ७४७' या विमानाला मिनिटभराच्या प्रवासासाठी २४० लीटर इंधन लागतं. बोईंगच्या संकेतस्थळावर याबाबत माहिती देण्यात आली आहे. त्यानुसार 'बोईंग ७४७' ला दहा तासांच्या प्रवासासाठी तब्बल ३६ हजार गॅलन म्हणजे १,५०,००० लीटर इंधन लागतं. एक मैल अंतरासाठी या विमानाला साधारण पाच गॅलन इंधन लागतं. म्हणजे प्रति किलोमीटर अंतर कापण्यासाठी 'बोईंग ७४७' ला १२ लीटर इंधन लागतं. या विमानातून एकाच वेळी ५०० प्रवासी प्रवास करतात. म्हणजे १२ लीटर इंधन भरल्यानंतर एवढे प्रवासी एक किलोमीटर अंतर पार करतात. म्हणजे हे विमान एक किलोमीटर अंतर कापण्यासाठी प्रत्येक व्यक्तीवर ०.०२४ लीटर इंधन खर्च करतं. मायलेजबाबत बोलायचं तर हे विमान एक लीटर इंधनात ०.८ किलोमीटर अंतर कापतं. हे अंतर अर्थातच खूप कमी आहे.

## रुग्णसेवेचा अनोखा मार्ग

**वा**हतूक कोंडीत अडकलेल्या रुग्णवाहिकेला रस्ता मोकळा करून देण्यासाठी इंडोनेशियामध्ये बायकर्स ग्रुपची स्थापना करण्यात आली आहे. 'इंडोनेशियन ॲस्कॉर्टिंग ॲम्ब्युलन्स ग्रुप' देशातल्या ८० शहरांमध्ये कार्यरत असून या ग्रुपचे दोन हजार सदस्य आहेत. रुग्णांचा जीव वाचवण्यासाठी हा ग्रुप झपाटल्याप्रमाणे काम करतो. अनेकजण रुग्णसेवेचं व्रत स्वीकारतात. या बायकर्सनीही हे व्रत स्वीकारलं आहे. रुग्णसेवेची त्यांची पद्धत वेगळी आहे. स्वत:च्या बाईकवर स्वार होऊन हे बायकर्स रुग्णवाहिकेच्या पुढून आणि मागून चालत रहातात. मध्ये येणाऱ्या वाहनांना बाजूला करून रुग्णवाहिकेसाठी मार्ग मोकळा करतात. या सेवेसाठी कोणतंही शुल्क आकारलं जात नाही. इंडोनेशियातल्या रस्त्यांवर खूप गर्दी असते. वाहतूक कोंडीमुळे रुग्णवाहिका वेळेत न पोहोचल्याने रुग्णांचा जीव जातो. ही बाब लक्षात आल्यानंतर काहीजणांनी पुढाकार घेऊन रुग्णांचा जीव वाचवण्यासाठी प्रयत्न करायचं ठरवलं. २०१७ मध्ये जकार्तामध्ये ५० जणांच्या बायकर्स ग्रुपची स्थापना झाली. त्यानंतर या ग्रुपच्या सदस्यसंख्येत वाढ होत गेली. बायकर्सचा हा ग्रुप पूर, भूकंपासारख्या नैसर्गिक आपत्तींमध्येही मदतकार्य करतो. इंडोनेशियातल्या प्रमुख रुग्णालयांकडे बायकर्स ग्रुपच्या सदस्यांचे मोबाईल क्रमांक आहेत. रुग्णवाहिका अडकल्यानंतर त्यांना तातडीने संदेश पोहोचतो आणि बायकर्स मदतीला धावतात. बायकर्स ग्रुपचं हे कार्य वाखाणण्याजोगं आहे.




## येथे दुबईपेक्षा स्वस्त सोने!

**भा**रतीय आणि त्यांचे सोन्यावर असलेले प्रेम हे जगभरात प्रसिद्ध आहे. प्रत्येक भारतीय महिलेला आणि पुरुषालाही आपल्या अंगावर सोने असावे, अशी इच्छा असते. सोने हे केवळ दागिने नसून ते गुंतवणुकीचे माध्यम म्हणूनही अनेकजण त्याकडे पाहतात आणि आपला पैसा गुंतवतात.

भारतात आता सोन्याच्या किमतींनी कळस गाठला आहे. सर्वसामान्यांच्या अवाक्याबाहेर त्याच्या किमती गेल्या आहेत. त्यामुळे दुबई आणि इतर अरब देशांतून सोने आणण्याकडे अनेकांचा कल आहे; पण दुबईपेक्षाही स्वस्त सोने जगात आणखी एका देशात मिळते. जगातील सर्वात स्वस्त सोने कोणत्या देशात मिळते असा प्रश्न पडला असेल, तर त्याचे उत्तर भूतान असे आहे. जगातील सर्वात स्वस्त सोने आशियाई देश भूतानमध्ये मिळते.

*** भूतानमध्ये सोने स्वस्त का ?**

भूतानमध्ये सर्वात स्वस्त सोने मिळण्याची अनेक कारणे आहेत. भूतानमध्ये स्वस्त सोने मिळण्याची अनेक कारणे असली, तरी सर्वात मोठे कारण म्हणजे भूतानमध्ये सोने हे करमुक्त आहे. सोने स्वस्त असण्याचे तेच सर्वात मोठे कारण मानले जात आहे. याशिवाय भूतानमध्ये सोन्यावर कमी आयात शुल्क आहे. भूतान आणि भारताच्या चलनाचे मूल्य जवळपास सारखेच आहे.

*** सोने खरेदी करताय, अटी पाहा**

भूतानमधून सोने खरेदी करताना काही अटी लक्षात ठेवाव्या लागतील. सोने खरेदी करण्यासाठी पर्यटकांना भूतान सरकारने प्रमाणित केलेल्या हॉटेलमध्ये किमान एक रात्र मुक्काम करावा लागतो. पर्यटकांना भूतानमध्ये सोने खरेदीसाठी अमेरिकन डॉलर आणावे लागतात. पर्यटकांना शाश्वत विकास शुल्क (एसडीएफ) भरावे लागते. त्याच वेळी भारतीयांना प्रति व्यक्ती प्रतिदिन १,२०० ते १,८०० रुपये मोजावे लागतात. पर्यटकांना सोने खरेदी करण्यासाठी पावती घेणे आवश्यक आहे. भूतानमधील ड्युटी-फ्री शॉपमधून ड्युटी-फ्री सोने खरेदी करता येते. ही दुकाने सामान्यत: लक्झरी वस्तूंची विक्री करतात आणि ती वित्त मंत्रालयाच्या मालकीची असतात.



# रवींद्र चव्हाण भाजपचे नवे कार्यकारी अध्यक्ष

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. १२ :



भाजप नेते आणि माजी मंत्री रविंद्र चव्हाण यांच्यावर पक्षाने मोठी जबाबदारी दिली आहे. रविंद्र चव्हाण यांची भाजप महाराष्ट्राचे कार्यकारी प्रदेशाध्यक्ष म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष जे पी नड्डा यांनी ही नियुक्ती केली आहे. विद्यमान प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे हे विधानसभेवर निवडून गेल्यामुळे रविंद्र चव्हाण यांच्या कार्यकारी प्रदेशाध्यक्ष पदाची जबाबदारी सोपवण्यात आली.

भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे मंत्रिपदाची शपथ घेतली. पण भाजपचे ज्येष्ठ नेते रवींद्र चव्हाण यांना मंत्रिपद न मिळाल्याने ते पक्ष-संघटनेत प्रदेशाध्यक्ष होणार अशी चर्चा राजकीय वतुर्ळात रंगली होती. त्यावर अखेर आज शिक्कामोर्तब झाले. भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष जे. पी. नड्डा यांच्या पत्राद्वारे शिडीर्तील भाजपच्या अधिवेशनाच्या पूर्वसंध्येला त्यांच्या नावाची अधिकृत घोषणा करण्यात आली.

रवींद्र चव्हाण हे एकनाथ शिंदे सरकारमध्ये सार्वजनिक बांधकाम मंत्री म्हणून कार्यरत होते. सलग चौथ्यांदा डोंबिवली विधानसभेतून निवडून आलेले आहेत. मात्र, यंदा त्यांना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मंत्रिमंडळ विस्तारामध्ये स्थान मिळाले नाही.

दुसरीकडे भाजपचे विद्यमान प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांचा मंत्रिमंडळात समावेश झाला असून महसूल मंत्रिपद मिळाले आहे, त्यानंतर आता रवींद्र चव्हाण यांना महाराष्ट्र भाजपच्या कार्यकारी अध्यक्षपद मिळाले आहे. राज्यात मराठा आंदोलनानंतर लोकसभा निवडणुकीत भाजपला मोठा फटका बसला. यामुळे जर आता मराठा समाजाचा प्रदेशाध्यक्ष दिल्यास आगामी स्थानिक स्वराज्य संस्थाच्या निवडणुकीत भाजपला फायदा होऊ शकतो. यापूर्वी कल्याण डोंबिवली, मीरा भाईंदर, उल्हासनगर, ठाणे, पनवेल, महापालिकेत भाजपची सत्ता आणण्यासाठी सर्वात महत्त्वाची भूमिका बजावल्याने राज्यातील आगामी स्थानिक स्वराज्य संघटनांवर वर्चस्वासाठी त्यांच्यावर प्रदेशाध्यक्षपदाची जबाबदारी देण्यात आल्याचे बोलले जात आहे. २०२४ मध्ये चौथ्यांदा डोंबिवलीतून आमदार झालेल्या रवींद्र चव्हाण यांच्यावर ज्या ज्या निवडणुकीची जबाबदारी देण्यात आली, त्या निवडणुकीत भाजपला त्यांनी विजय मिळवून दिला आहे.

# अपघातग्रस्ताची ओळख करून देणार क्यू आर कोड

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १२ :



राज्यात रस्त्यांवर मोठ्या प्रमाणावर अपघाताचे सत्र सुरू आहे. नवे रस्ते बनवण्याचे काम सुरू असल्यामुळे अथवा चालकाच्या चुकीमुळे अनेकदा मोठे अपघात होत असतात. ११ ते ते १८ जानेवारीपर्यंत यंदा ३५ वा राष्ट्रीय रस्ता सुरक्षा सप्ताह संपूर्ण देशातच मोठ्या उत्साहाने साजरा केला जाणार आहे. यावर्षापासून रस्ते अपघात रोखण्यासाठी सेफ वे रोड सेफ्टी सोल्युशन्स इंडिया द्वारा चार चाकी वाहन, तीन चाकी तथा दुचाकी वाहनांवर इमर्जन्सी क्यू आर कोड लावण्याच्या कामाला सुरुवात होणार आहे.

महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्ह्यातून या अभियानाला सुरुवात करण्यात येणार आहे. याचा प्रथम टप्पा नागपुरातून सुरू होणार आहे. रस्त्यावर होणारे अपघातात, अपघातग्रस्त जखमींना तत्काळ मदत मिळावी या हेतूने या क्यूआर कोडची निर्मिती करण्यात आली आहे.

अनेकदा रस्त्यांवर अपघात झाल्यास अपघात ग्रस्तांची ओळख नसल्यामुळे त्याला वेळेत मदत मिळण्यास विलंब होतो. एखाद्या व्यक्तीचा अपघातात मृत्यू झाल्यास अथवा गंभीरपणे जखमी झाल्यास या अपघाताची माहिती त्याचा परिवाराला मिळण्यासही किमान पाच ते सहा तासांचा अवधी लागतो. अपघातग्रस्त हा बेशुद्ध अवस्थेत असल्यामुळे त्याच्या परिवाराला माहिती मिळत नाही. अपघात ग्रस्तांची ओळख पटविण्याकरिता पोलिसांनासुद्धा मोठा कालावधी लागतो. त्यामुळे यावर उपाय शोधण्यात आला आहे.

सध्या आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून अपघाग्रस्ताला वेळेत उपचार मिळवून देण्यासाठी महत्त्वाचे पाऊल उचलण्यात आले आहे. प्रत्येकाजवळ भ्रमनध्वनी असतो. परंतु, त्याला पासवर्ड असते. त्यामुळे तो उघडता येत नाही. त्यामुळे यापुढे अपघातग्रस्त गाडीला इमर्जन्सी क्यू आर कोड लावण्यात येणार आहे. यामुळे अपघातग्रस्ताचा भ्रमनध्वनी क्रमांक कळू शकेल. तसेच एखाद्या ठिकाणी अपघात झाल्यास अपघातग्रस्ताच्या कुटुंबीयांना तत्काळ माहिती पोहोचण्याच्या दृष्टिकोनातून एसएमएस सुविधेचा वापर केला जाणार आहे. याशिवाय या क्यू आर कोड मध्ये तात्काळ रुग्णवाहीका सेवा मिळणार आहे.

यासाठी रुग्णवाहिका सेवा १०८ तथा पोलीस सेवेसाठी ११२ सारख्या महत्त्वाच्या बटन्स निर्मित केल्या आहेत. तसेच अनेकदा बरेच प्रमाणावर गाड्यांचा पार्किंगचा मोठा विषय सार्वजनिक ठिकाणी उपस्थित होतो. वाहन शिस्तबद्ध पद्धतीने राहत नाही. यावरसुद्धा आळा घालण्यासाठी या क्यू आर कोडमध्ये ह्यनो पार्किंगची माहिती देणाऱ्या बटन जोडण्यात आली आहे.

हा क्यूआर कोड कुठल्याही अँड्रॉइड मोबाईलमधून सहजपणे स्कॅन केला जाऊ शकतो. ज्याला कोणलाही पैसे देण्याची गरज पडणार नाही. त्यामुळे प्रत्येकाने गाडीवर हा इमर्जन्सी क्यू आर कोड लावणे महत्त्वाचे ठरणार आहे. या अभियानाची आज नागपूर येथील मॉडेल हायस्कूल अँड ज्युनियर कॉलेज गणेश टेकडी रोड नागपूर येथून करण्यात आली. यावेळी अनेक चार चाकी वाहनांना क्यू आर कोड लावण्यात आले, व त्याविषयीची माहिती देण्यात आली. तसेच या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सेफ्टी रोड सेफ्टी सोल्युशन्सचे शशिकांत भोयर, अमृतलाल चरडे, राजहंस शेंडे आदी उपस्थित होते.

## आयआरसीटीसी संकेतस्थळ काही काळ बंद

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. १२ :

इंडियन रेल्वे कॅटरिंग अँड टूरिझम कॉर्पोरेशनच्या (आयआरसीटीसी) संकेतस्थळामध्ये शनिवारी सकाळी तांत्रिक समस्या येत होती. प्रवाशांनी संकेतस्थळावरून तिकीट काढण्याचा प्रयत्न केला असता अनेक त्रुटी येत होत्या. तसेच संकेतस्थळावर पुढील तासभर तिकीट आरक्षण, तिकीट रद्द करण्याची सेवा बंद राहणार, असा संदेश प्रवाशांना दिसत होता. त्यामुळे प्रवाशांना सकाळी तिकीटे काढता आली नाहीत.

गेल्या अनेक आठवड्यांपासून आयआरसीटीसीच्या संकेतस्थळात सकाळच्या सुमारास तांत्रिक बिघाड होत असल्याचे निदर्शनास आले आहे. याबाबत प्रवाशांनी समाज माध्यमावर प्रचंड संताप व्यक्त केला. सकाळच्या वेळी तत्काळ तिकीट काढताना संकेतस्थळ बंद होत असल्याने, प्रवाशांना तत्काळ तिकिटे खरेदी करता येत नाही.

## कुर्ल्यातील उपाहारगृहात भीषण आग

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १२ :

कुर्ला पश्चिमेकडील एलबीएस मार्गावरील रंगून ढाबा या हॉटेलमध्ये शनिवारी रात्री सव्वा नऊच्या सुमारास भीषण आग लागली. ही आग इतकी भडकली होती की आगीच्या ज्वाळा दूरूनही दिसत आहेत. उपाहारगृहाच्या खालच्या मजल्यावर ही आग लागली आहे. अग्निशमन दलाचे पथक घटनास्थळी पोहोचले असून आग विझवण्याचे काम सुरू आहे.

कुर्ला पश्चिमेकडील लालबहादूर शास्त्री मार्गावर कल्पना टॉकीजच्या समोर असलेल्या रंगून जायका ढाबा या हॉटेलमध्ये भीषण आग लागली. रात्री सव्वा नऊच्या सुमारास लागलेली ही आग काही वेळातच भडकली असून आगीची तीव्रता वाढण्याची शक्यता वर्तवली जात आहे. एलबीएस मार्गावरून वाहनांची सतत वर्दळ सुरू असते. तसेच या मार्गावर अनेक ढाबे एकमेकांना खेटून आहेत. त्यामुळे घटनेचे गांभीर्य वाढले आहे. घटनास्थळी पालिका विभाग कार्यालयाचे पथक, अग्निशमन दलाचे पथक, चार फायर इंजिन, तीन पाण्याचे टँकर, पोलीस, विद्युत वितरण कंपनीचे पथक जमले आहे.

## मुंबई विमानतळावर सोने, चरस, गांजा जप्त

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. १२ :

सीमाशुल्क अधिकाऱ्यांनी छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळावर गुरुवार आणि शुक्रवारी केलेल्या दोन वेगवेगळ्या कारवाईत १.२५७ किलो सोने आणि ३० किलो चरस जप्त केले. रस अल - खैमाह येथून सोने आणि बँकॉकहून चरस, गांजाची तस्करी करण्यात आली होती. या प्रकरणी सीमाशुल्क अधिकाऱ्यांनी सहा प्रवाशांना अटक केली. जप्त करण्यात आलेल्या सोन्याची किंमत सुमारे ९१ लाख रुपये, तर चरस आणि गांजाची किंमत अनुक्रमे ३० कोटी रुपये आणि ११ कोटी रुपये आहे.

मुंबईतील छत्रपती शिवाजी महाराज विमानतळावर रस अल - खैमाह येथून आलेल्या एका प्रवाशाला सीमाशुल्क अधिकाऱ्यांनी अडवले. या प्रवाशाची तपासणी केली असता त्यांच्याकडे मेणात दडवलेली २४ कॅरेट सोन्याची भुकटी आणि २४ कॅरेट सोन्याच्या १.२५७ किलोग्रॅम वजनाच्या साखळ्या सापडल्या. त्यांची किंमत सुमारे ९१ लाख रुपये आहे. प्रवाशाने हे सोने मोजे आणि बूटांमध्ये लपवले होते. एका प्रवाशाला अटक करण्यात आली.

## महावितरणला सर्वोत्कृष्ट कामगिरीबद्दल राष्ट्रीय पुरस्कार

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १२ :

शेतकऱ्यांना दिवसा वीज पुरवठा करण्यासाठी मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० या नाविन्यपूर्ण योजनेच्या यशस्वी अंमलबजावणी बद्दल महावितरण आणि एमएसईबी सोलर अँग्रो पॉवर लिमिटेड कंपनीला शनिवारी बेळगावी येथे आयपीपीएआय पुरस्कार सोहळ्यात राष्ट्रीय पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. त्याचसोबत सर्वोत्कृष्ट कामगिरीबद्दल विविध वर्गवारीतील एकूण आठ पुरस्कार देऊन महावितरणचा सन्मान करण्यात आला.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० चा गौरव झाल्याबद्दल महावितरणचे आणि अपर मुख्य सचिव (ऊर्जा) आभा शुक्ला यांच्या नेतृत्वाखालील एमएसईबी सोलर अँग्रो पॉवर लिमिटेड कंपनीचे अभिनंदन केले. महावितरणचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक मा. लोकेश चंद्र यांनी मा. मुख्यमंत्र्यांचे आभार मानले असून कंपनीच्या गौरवाबद्दल महावितरणचे वीज ग्राहक तसेच सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांचे अभिनंदन केले. इंडिपेंडेन्ट पॉवर प्रोड्युसर्स असोसिएशन ऑफ इंडिया (आयपीपीएआय) या राष्ट्रीय संस्थेने देशभरातील विद्युत कंपन्यांच्या कामगिरीचे मूल्यमापन करून हे पुरस्कार दिले.

सौरऊर्जेचा वापर करून वीजनिर्मिती करायची व त्या आधारे कृषी फीडर्स चालवून शेतकऱ्यांना कृषी पंपांसाठी दिवसा वीज पुरवठा करायचा अशी नाविन्यपूर्ण मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० महावितरणतर्फे राज्य सरकारचा ऊर्जा विभाग व एमएसईबी सोलर अँग्रो पॉवर लिमिटेड कंपनीच्या सहकार्याने राबविण्यात येत आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली अंमलात येणारी ही योजना शेतकऱ्यांना लाभदायक ठरण्यासोबत उद्योगांवरील क्रॉस सबसिडीचा बोजा कमी करणारी आणि एकंदरितच ऊर्जा क्षेत्रात परिवर्तन करणारी आहे. या योजनेमुळे कार्बन उत्सर्जन कमी करण्यास मदत होणार आहे. या योजनेच्या अंमलबजावणीसाठी महावितरणला शनिवारच्या सोहळ्यात दोन पुरस्कार देण्यात आले. महावितरणचे प्रशिक्षण विभागाचे प्रमुख मुख्य महाव्यवस्थापक दत्तात्रय बनसोडे, वितरण विभागाचे अधीक्षक अभियंता अमित बोकील, विशेष प्रकल्प विभागाचे कार्यकारी अभियंता शरद बंड, उपकार्यकारी अभियंता आरती कुलकर्णी व सामग्री विभागाचे कार्यकारी अभियंता रमेश देठे यांनी कंपनीतर्फे पुरस्कार स्वीकारले.

ग्राहकांमध्ये जागृती निर्माण करण्याच्या गटात असाधारण कामगिरी करणारी विद्युत वितरण कंपनी म्हणून महावितरणची निवड करण्यात आली. विद्युत वाहनांच्या वापराला प्रोत्साहन देण्याच्या बाबतीत दुसऱ्या क्रमांकाची कंपनी म्हणून महावितरणला पुरस्कार देण्यात आला. बड्या विद्युत वितरण कंपन्यांच्या गटात पहिल्या तीन सर्वोत्कृष्ट कंपन्यांमध्ये महावितरणचा समावेश झाला. महावितरणला माहिती तंत्रज्ञानाचा कल्पक वापर करण्याबद्दल, विकेंद्रित स्वरुपात बॅटरी स्टोरेज सिस्टिम विकसित करण्याबद्दल आणि प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीबद्दल असे आणखी तीन पुरस्कार प्राप्त झाले.

## तापमानात घट होण्याची शक्यता

**मुंबई :** मागील काही दिवसांपासून तापमानात वाढ झाली आहे. त्यामुळे पहाटे काहीसा गारवा आणि दिवसभर उकाड्याचा सामना करावा लागतो. गेल्या आठवड्यात कमाल तापमानाचा परा ३५ अंशाच्या आसपास आणि किमान तापमान २० अंशाहून अधिक होता. दोन दिवसांपासून तापमानात घट व्हायला सुरुवात झाली आहे. पहाटेच्या गारव्यामुळे नागरिकांना किंचित दिलासा मिळत आहे.

